


# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

पुढच्या वर्षी लवकर या

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026





अमरावती शहराच्या पाणीपुरवठ्याकरीता

## 865 कोटीची अमृत योजना

मंजूर करून आणल्याबद्दल

तसेच

अमरावती शहरातील मालमत्तांना

## जुनी करप्रणाली लागू केल्याबद्दल



आपले शतशः

# आभार

माननीय आमदार

## सौ.सुलभाताई संजयराव खोडके



१८ सप्टेंबर

आपणांस वाढदिवसाच्या

# हार्दिक शुभेच्छा!

• शुभेच्छुक

मित्र परिवार,

अमरावती

ARNAV

RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

पुढच्या वर्षी लवकर या

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२१० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.१७ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -७

## मी सरन्यायाधीशांच्या घरी श्रीगणेशाची पूजा केली म्हणून काँग्रेसला त्रास झाला, पीएम मोदींचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या घरी भगवान श्रीगणेशाची पूजा केली होती. सरन्यायाधीशांच्या घरी गणपती पूजा करण्यावरुन विरोधकांनी त्यांच्यावर प्रचंड टीका केली. त्या सर्व टीकेवर पंतप्रधान मोदींनी मंगळवारी(दि.१७) अनंत चतुर्दशीच्या दिवशी प्रतिक्रिया दिली.



पीएम नरेंद्र मोदी म्हणाले की, आजही समाजात फूट पाडणाऱ्या आणि समाज फोडण्यात गुंतलेल्या सत्तेच्या भुकेल्या लोकांना गणेश पूजनात अडचणी आहेत. मी सरन्यायाधीशांच्या घरी गणेश पूजेत सहभागी झालो, म्हणून काँग्रेस आणि त्यांच्या इको सिस्टीममधील लोकांना त्रास व्हायला लागला. समाजात फूट पाडणाऱ्यांना गणेश उत्सवाचीही अडचण आहे.


कर्नाटकातील काँग्रेस सरकारने मोठा गुन्हा केला. या लोकांनी गणपतीची मूर्तीची तुरुंगात ठेवली. त्या चित्रांनी संपूर्ण देश व्यथित झाला होता. ही द्वेषपूर्ण विचारसरणी समाजात विष पसरवणारी आहे. हे आपल्या देशासाठी अत्यंत घातक आहे. या द्वेषपूर्ण विचारसरणीला आळा घालणे गरजेचे आहे. अशा शक्तींना आपण पुढे जाऊ देऊ नये, असेही पीएम मोदी यावेळी म्हणाले.

मोदी पुढे म्हणतात, आपल्या देशासाठी गणेश उत्सव हा केवळ श्रद्धेचा उत्सव नाही. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यात गणेशोत्सवाचा मोठा वाटा आहे. इंग्रज देशाचे तुकडे पाडण्यात व्यस्त होते, जाती-धर्माच्या नावावर देशात फूट पाडली जात होती, तेव्हा गणेशोत्सवाने लोकांना एकत्र बांधून ठेवम्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## गणपती बुद्धीची देवता, सर्वात जास्त गरज आहे त्यांना बुद्धी द्यावी : देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्ष तयारीला लागले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीत जागावाटपाच्या चर्चा अंतिम टप्प्यात आल्याचे म्हटले जात आहे. अनेक जागांवर एकमत झाले असून, काही जागांवरील निर्णय लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास दोन्ही गटांकडून केला जात आहे. यातच अनंत चतुर्दशीला गणरायाला निरोप देण्यात येत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी घरी विराजमान झालेल्या बाप्पाला निरोप दिला. यावेळी त्यांनी विरोधकांना टोला लगावला.



राज्यात नोव्हेंबर महिन्याच्या मध्यावर विधानसभा निवडणूक होण्याचे संकेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. महायुतीच्या नेत्यांमध्ये सध्या जागावाटपाची बोलणी सुरु आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत जिंकण्याचा विश्वास असलेल्या ८५ जागा भाजपाने काढल्या असून, त्यावर लक्ष केंद्रित करताना गेल्यावेळी जिंकलेल्यांपैकी २५ जागांवर यावेळी अधिक मेहनत करावी लागणार असल्याचा सूर पक्षाच्या विविध बैठकांमध्ये व्यक्त होत आहे. शासकीय निवासस्थानी सहकुटुंब गौरीनंदन गणरायाची आरती केली. गेले दहा दिवस गणरायाच्या सहवासामध्ये कसे गेले ते कळलेच नाही. बाप्पांना निरोप देण्याचा क्षण आला आहे. यावेळी गणरायाकडे जनतेच्या सर्व चिंता-विघ्ने दूर करावे आणि पुढच्या वर्षी अशाच प्रकारे हसत खेळत आनंद घेऊन लवकर यावे, अशी प्रार्थना केली, असे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तसेच गणपती बाप्पा हा विघ्नहर्ता आहे. त्याने सर्वांची विघ्न दूर करावीत. तसेच गणपती हा बुद्धीची देवता आहे. त्यामुळे गणपती बाप्पाने आम्हालाही सुबुद्धी द्यावी आणि ज्यांना सर्वात जास्त बुद्धीची गरज आहे त्यांनाही द्यावी, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## हिऱ्याच्या पोटी गारगोटी, बाळासाहेबांच्या नावाला कलंक; मुख्यमंत्री शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर पलटवार

### उद्धव ठाकरेंच्या टीकेवर एकनाथ शिंदेंनी केला हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मुंबई**

आम्हाला शिव्याशाप देणं, आरोप करतात, मला कलंकनाथ नाव दिलं परंतु महाराष्ट्रात बाळासाहेबांच्या नावाला कलंक ते आहेत. हिऱ्याच्या पोटी गारगोटी असं मी म्हणतो, बाळासाहेबांचे विचार जेव्हा त्यांनी सोडले तेव्हा खऱ्याअर्थाने सर्व संपले अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर पलटवार केला आहे. ठाकरेंनी केलेल्या टीकेवर मुख्यमंत्र्यांनी हे विधान केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आम्ही बाळासाहेबांचे विचार घेऊन पुढे जातोय. योग्यवेळी मी बोलेन. आम्ही आतापर्यंत काही मनावर घेतले नाही. सरकार स्थापन झाल्यापासून नवनवीन उपाध्या आम्हाला दिल्या आहेत. जर आम्ही त्यांच्याकडे लक्ष देत राहिलो तर कामावर आमचे दुर्लक्ष होईल त्यामुळे तिकडे लक्ष देत नाही. आयतखाऊ पेक्षा लाडका भाऊ कधीही चांगला, आतापर्यंत घरात बसूनच सर्व चाललं होतं आणि आजही सुरू आहे. ज्या जनतेने कौल दिला होता त्याच्याशी विश्वासघात कुणी केला हे महाराष्ट्रातील जनतेला माहिती आहे. त्यामुळे झालेल्या



लोकसभेत आम्ही त्यांना त्यांची जागा दाखवली. त्यांच्यापेक्षा स्ट्राईक रेट, मतांची टक्केवारी, जागा हे जनतेने दाखवून दिलंय असं त्यांनी सांगितले.

तसेच तुम्ही जर स्वार्थासाठी, खुर्चीसाठी वैचारिक विचार सोडाल तर जनता तुम्हाला माफ करणार नाही.काँग्रेसच्या व्होटबँकवर ते मोठे होण्याचा प्रयत्न करतायेत. आम्ही टीमवर्क म्हणून काम करतोय. महायुती जिंकण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. रोज सकाळचे भोंगे दाखवण्यापेक्षा लोकांच्या जीवनात काय काय बदल होतायेत, विकास काय काय झालाय हे दाखवला तर तुमचा टीआरपी वाढेल. महाराष्ट्राचं लोकमत आमच्या बाजूने आहे असा विश्वासही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

परदेशी गुंतवणूक ५२ टक्के एकट्या महाराष्ट्रात आहेत. विकास आणि कल्याणकारी योजना याची सांगड आम्ही घालतोय. विविध योजना आमच्या सरकारने लोकांसाठी आणल्या आहेत. आतापर्यंतच्या इतिहासात कधीही इतक्या योजना आल्या नाहीत. कुटुंबातील प्रत्येक घटकासाठी योजना आहेत. त्यामुळे संपूर्ण कुटुंब सुखी, समाधानी आनंदी कसं होईल यासाठी प्रयत्न करतोय. त्यामुळे येणाऱ्या लोकशाहीच्या उत्सवात आमचे सर्व घटक आमच्या कामाची पोचपावती देतील असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

## पुण्यात वैभवशाली मिरवणुकीला ढोल ताशांच्या गजरात सुरुवात

### मानाचा पहिला कसबा गणपती समाधान चौकातून मार्गस्थ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ पुणे**

ढोल ताशाचा गजर अन् मोरयाचा जयघोषात पुण्यात वैभवशाली मिरवणुकीला सुरुवात झाली आहे. मानाचा पहिला गणपती श्री कसबा गणपती समाधान चौकातून लक्ष्मी रस्त्याकडे मार्गस्थ झाला.

दरवर्षी आपल्या तालाने मंत्रमुग्ध करणारे रमणबाग ढोल ताशा पथकाने समाधान चौकात आकर्षक वादन केले. त्यानंतर रुद्रगर्जना पथकाने ठेका धरत नागरिकांचा उत्साह वाढवला. सोबतच गणरायाच्या गाण्यांची साथ देत प्रभात बँडने आपले वादन केले.पहिला गणपती कसबा गणपती असा जयघोष करत बाप्पा पालखीतून टिळक चौकाकडे दरवर्षी कसबा गणपतीचे परंपरेनुसार पालखीतून विसर्जन केले जाते. मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच प्रतिष्ठित लोक पालखीला खांदा देतात. पालखीच्या बाजूने अब्दागिरी, सांस्कृतिक वेशभूषेत असणाऱ्या महिला, पदाधिकारी मिरवणुकीचे आकर्षण ठरत असते.१० दिवस उल्हासाने पूजन केलेल्या बाप्पाचे आज



थाटात विसर्जन केले जाणार आहे. बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकांमध्ये आज जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळत आहे. पुण्यातील टिळक चौकात विसर्जन मिरवणूकींच्या समोर शंखनाद करण्यात आला आहे.

#### लालबागचा राजा विसर्जन मिरवणूकीसाठी सज्ज

१० दिवसांच्या सेवेनंतर आज बाप्पाला निरोप देण्यात येणार आहे. मुंबईत विसर्जन मिरवणूकीसाठी लालबागचा राजा सज्ज झाला आहे. मंडळाकडून लालबागच्या राजाला आकर्षक सजावट केली आहे. फूल माळांनी सजवून आज आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी मंडळाचे कार्यकर्ते देखील सज्ज झाले आहेत.

गेल्या १० दिवसांपासून भाविक भक्तांनी लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. नवसाला पावणारा राजा म्हणून लालबागच्या राजाची ओळख आहे. लाखोंच्या संख्येने भाविक इथे दर्शनासाठी येत असतात. आज भाविक आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देणार आहेत. सकाळपासूनच मंडळांचे मानाचे गणपती विसर्जनासाठी सज्ज झाले आहेत. लालबागच्या राजा देखील थोड्या वेळातच विसर्जनासाठी मार्गस्थ होणार आहे. मंडळाकडून लालबागच्या राजाला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. शेवटची आरती झाल्यानंतर राजाची विसर्जन मिरवणूक सुरू होणार आहे. साधारणत: सकाळी ११ वाजता आरती नंतर लालबागचा राजा विसर्जनासाठी मार्गस्थ झाला आहे.

## जरांगे पाटील यांनी सरकारला सहकार्य करावे; कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देणार; मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७छत्रपती संभाजीनगर**

मराठा समाजाची आरक्षणाबाबत सरकारने सहकार्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे मराठा समाज आणि मनोज जरांगे पाटील यांनी देखील सहकाऱ्यांची भूमिका घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. मराठा समाजाचा वापर करून घेणाऱ्यांना जाब विचारणार की नाही? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. कोणाचीही दिशाभूल करणार नाही, कायद्याच्या चौकटीत बसणारे आणि इतर कोणत्याही समाजावर अन्याय न करणारे आरक्षण मराठा समाजाला देणार असल्याचा दावा देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

आरक्षणाबाबत कोणत्याही समाजाची फसवणूक करणार नाही, कायद्याच्या चौकटीत राहून जे शक्य आहे, ते सर्व देणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आरक्षणाबाबत कोणाचीही



फसवणूक करणार नाही. दिलेला शब्द पाळणारे हे सरकार असल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. त्यामुळे माझे आवाहन आणि विनंती आहे, सरकारने सहकार्याची भूमिका घेतल्यानंतर मराठा समाजाने देखील सहकाऱ्याची भूमिका घेतली पाहिजे.

ज्यांना आतापर्यंत संधी होती. मात्र, त्यांनी आतापर्यंत काही दिलेले नाही, त्यांनी काही न देता केवळ मराठा समाजाच्या भावनांशी खेळ केला. त्यांची देखील भूमिका स्पष्ट असली पाहिजे. आमची भूमिका स्पष्ट आहे. मराठा समाजाला न्याय देण्याची आमची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे. इतरही कोणत्याच समाजावर अन्याय न होता मराठा समाजाला त्यांचा हक्क मिळाला पाहिजे, असे देखील मुख्यमंत्री यांनी म्हटले आहे. मराठा समाजाचा वापर करून घेणाऱ्यांना जाब विचारणार की नाही? असा प्रश्न देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विचारला आहे.

## पुण्यात तर्राट वाहनचालकाचा प्रताप थेट चंद्रकांतदादांच्या गाडीलाच ठोकलं

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ पुणे**

कल्याणी नगर येथील पोर्श कार अपघात प्रकरणाच्या जखमा पुणेकरांच्या मनात ताज्या आहेत. त्यानंतरही पुण्यात मद्यधुंद अवस्थेत कार चालवून अपघातांना निमंत्रण देण्याचं प्रमाण काही कमी होताना दिसत नाही. आता तर सर्वसामान्य नागरिकच नाही, तर मंत्री आणि त्यांच्या गाड्याही सुरक्षित नसल्याचं समोर आलं आहे. कारण भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील अपघातातून थोडक्यात बचावले आहेत.



काल रात्री बारा वाजताच्या सुमारास ड्रिंक अँड ड्राईव्हच्या घटनेतून घडलेल्या अपघातामधून चंद्रकांत पाटील बालंबाल बचावल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. खुद्द चंद्रकांत दादांनीच याविषयी माहिती दिली. या प्रकरणी कोथरूड पोलीस स्टेशनमध्ये कार चालक, त्याचे तीन मित्र आणि दोन मैत्रिणींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कार चालक हा अपघाताच्या वेळी मद्यधुंद अवस्थेत होता,

## भारतीय हॉकी संघाने घडवला इतिहास

### चीनचा पराभव करत पटकावले आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ बीजिंग**

भारताच्या हॉकी संघाने चीनचा पराभव करत आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद पटकावले आहे. भारतीय संघ विक्रमी पाचव्यांदा आशियाई ट्रॉफीचा पटकावण्यात यशस्वी ठरला आहे. चौथ्या क्वार्टरमध्ये भारताकडून जुगराज सिंगने एक गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली. चीनने अखेरच्या सेकंदापर्यंत गोल करण्याचा प्रयत्न केला पण भारतीय खेळाडूंनी



कडवी झुंज देत विजय आपल्या नावे केला. चीनने पहिल्यांदाच आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला होता. तर पाकिस्तानच्या संघाने दक्षिण कोरियाचा पराभव करत तिसरे स्थान मिळवले.

भारतीय हॉकी संघाने लागोपाठ दोन वेळा आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे जेतेपद पटकावले आहे. याआधी उपांत्य फेरीत भारतीय हॉकी संघाने कोरियाचा ४-१ असा पराभव केला होता. उपांत्य फेरीत कोरियन संघाविरुद्ध हरमनप्रीत सिंग, उत्तम सिंग आणि जर्मनप्रीत सिंग यांनी गोल केले. कर्णधार हरमनप्रीतने एकूण दोन गोल केले होते. हरमनप्रीत सिंगने संपूर्ण टूर्नामेंटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली, यासाठी हरमनप्रीतला प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा किताबही मिळाला.भारतीय हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४ मध्ये आश्चर्यकारक कामगिरी केली आहे आणि अंतिम फेरीपर्यंत एकही सामना गमावलेला नाही. यंदाच्या टूर्नामेंटमध्ये अपराजित राहिलेल्या भारतीय हॉकी संघाने पाचव्यांदा आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद पटकावले आहे. यापूर्वी, भारताने २०११, २०१६, २०१८ (पाकिस्तानसह संयुक्त विजेते) आणि २०२३ मध्ये ट्रॉफी जिंकली होती.

## संपादकीय ......

# कायद्याच्या कात्रीत आता ‘बुलडोझर’ कारवाई

अनधिकृत बांधकामांवर बुलडोझरने कारवाई व्हावी अशी सर्वसामान्य जनतेची इच्छा असते. त्याचे कारण अनेकदा प्रशासनाकडे पत्रव्यवहार करूनसुद्धा कारवाई होईलच याची कोणाला खात्री नसते. राज्याची सूत्रे हाताळणारा मुख्यमंत्री जर कणखर नेतृत्व करणारा असेल, तर त्याचे कौतुक होते. लोक त्याला डोक्यावर घेतात. बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांतील आरोपी असो, नाही तर खतरनाक गुंड असो. त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई होत असतानाच, स्थानिक प्रशासनाकडून संबंधित आरोपीच्या बेकायदेशीर बांधकामांवर तत्काळ कारवाई करण्याचा फंडा हा सध्या जनतेत लोकप्रिय झाल्याने जनतेकडूनच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना बुलडोझर बाबा या नावाने लोक संबोधू लागले आहेत. देशात कायदा आहे; परंतु त्याची अंमलबजावणी वेळेवर होत नसल्याने प्रशासनाबाबत उदासीनता असते. त्यामुळे अशा बेधडक बुलडोझर कारवायांसाठी जनतेची मूक संमती असते, असे आतापर्यंत दिसून आलेले आहे. त्याचवेळी उत्तर प्रदेश सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात या भाजपाप्रणीत राज्यात बुलडोझर कारवाईचा धमाका २०२० नंतर सुरू झाला आहे. या कारवाईबाबत गुन्हेगारांबद्दल तिडीक असलेल्या समाजामधून राज्य सरकारच्या कृतीबाबत समाधान व्यक्त केले जात असले तरी, दुखवणारा एक वर्ग काही प्रमाणात असतो. त्याच दुखावलेल्या मानसिकतेतून काही संस्थांकडून सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. आरोपींच्या घरावर मनमर्जीप्रमाणे बुलडोझर चालवण्याच्या कारवाईला मनाई करा, अशी ती याचिका होती. गुन्हेगारी कारवायांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींशी संबंधित असलेल्या मालमत्ता पाडण्यासाठी बुलडोझर वापरण्याच्या प्रथेशी संबंधित अनेक प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात आली होती. याला अनेकदा बुलडोझर न्याय असे संबोधले जात होते. याच बुलडोझर न्यायच्या संकल्पनेला आव्हान देण्यात आल्याने या सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी करण्यात आली. यूपी, मध्य प्रदेश, राजस्थानात बुलडोझर कारवाईचा उल्लेख करत अल्पसंख्याकांना टार्गेट केले जात आहे, असाही आरोप याचिकेतून करण्यात आला होता.

सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर काल सोमवारी सुनावणी झाली. त्यावेळी केंद्र सरकारची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी असा युक्तिवाद केला की, संबंधित पालिकेच्या कायद्याचे उल्लंघन होत असेल तरच आम्ही कारवाई करतो. उत्तर प्रदेशात मालमत्ता पाडण्यापूर्वी संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्यांनी उत्तर न दिल्यानंतर अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली. कोणत्याही स्थावर मालमत्तेचा मालक किंवा रहिवासी फौजदारी गुन्ह्यांमध्ये सहभागी आहे, या एकमेव कारणावरून अशा प्रकारची कोणतीही मालमत्ता पाडलेली नाही, असे तुषार मेहता यांनी खंडपीठाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला. मात्र सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारचा युक्तिवाद अमान्य केला. ‘केवळ दोषी असल्याच्या आधारे कुणाचेही घर पाडणे योग्य नाही. जर कुणी दोषी असेल तर त्याचे घर पाडले जाऊ शकत नाही’, असे सांगत सुप्रीम कोर्टाने बुलडोझर कारवाईवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. मात्र सार्वजनिक रस्त्यांवरील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, अगदी मंदिरांनाही संरक्षण देणार नाही, असेही खंडपीठाने स्पष्ट केले. त्याचवेळी घरे आणि इमारती पाडण्याबाबतच्या चिंतेचे निराकरण करण्यासाठी संपूर्ण भारतातील मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात येतील, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. त्यावर सॉलिसिटर जनरल तुषार मेहतांनी कोर्टाचे आदेश मान्य केले. त्याशिवाय बुलडोझर कारवाई अवैध बांधकाम बांधल्या प्रकरणी केली आहे, असे मेहता यांनी कोर्टात बाजू मांडत सांगण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पुढील सुनावणी १७ सप्टेंबरला होणार आहे.

उत्तर प्रदेशातील मुख्यमंत्री योगी यांच्याप्रमाणे महाराष्ट्रातही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कामाचे कौतुक करणारे पोस्टर जून-जुलै महिन्यात ठाण्यात झळकले होते. ‘महाराष्ट्राचा बुलडोझर बाबा’ असा मजकूर असणारे पोस्टर मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला होता. मुख्यमंत्री शिंदे यांनी अनधिकृत पब आणि बारवर कारवाईचा बडगा उगारत, बार बुलडोझरने जमीनदोस्त केले होते. त्याचप्रमाणे, पुण्यातील हॉटेल्समध्ये ड्रग्जची विक्री केली जात असल्याचे समोर आले. याचे राज्यभर पडसाद उमटले. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आदेशानंतर हॉटेल्सवर बुलडोझरने कारवाई केली होती. त्याचे कौतुक झाले होते. या उलट, राज्यात महाविकास आघाडी सरकार असताना, अभिनेत्री कंगना राणावत यांच्या खार येथील फ्लॅटवरील बांधकाम मुंबई महापालिकेने नोटीस न देता पाडल्या प्रकरणी तिला नुकसानभरपाई द्यावी, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने देत राज्य सरकार आणि मुंबई महापालिकेने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले होते. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याविरोधात बोलल्यामुळे तिला अडचणीत आणण्यासाठी, टार्गेट करण्यासाठी तोडकाम कारवाई केली होती, असा आरोप त्यावेळी कंगना राणावत हिने केला होता. त्यामुळे उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान या राज्यांत बुलडोझर कारवाईला विशिष्ट धर्मीयांनी हरकत घेतली असली तरी, भाजपा सत्तेत नसतानाही असे बुलडोझर चालवले गेले होते, ही बाब या निमित्ताने पुढे आली आहे. आता सर्वोच्च न्यायालय बुलडोझर कारवाईबाबत काय सूचना देते याकडे देशवासीयांचे लक्ष लागले आहे.

# कुक्कुटपालन व्यवसाय करताय ही दहा सूत्रं पाळा होईल खर्चात बचत

**दि. ७ विदर्भ प्रजासत्ताक**

कुक्कुटपालन व्यवसाय करताय ही दहा सूत्रं पाळा होईल खर्चात बचतकुक्कुटपालन व्यवसाय करताय ही दहा सूत्रं पाळा होईल खर्चात बचत कुक्कुटपालन व्यवसायात खर्च कमी करण्यासाठी खालील दहा सूत्रं पाळली जाऊ शकतात:




योग्य जातीची निवड: आपल्या परिसराच्या हवामानानुसार आणि बाजारपेठेच्या मागणीचा विचार करून योग्य प्रकारच्या कोंबडी जातीची निवड करा. उच्च उत्पादन देणाऱ्या जातींमध्ये कमी खर्चात अधिक नफा मिळतो.

अन्न व्यवस्थापन: कोंबड्यांच्या आहारात उच्च दर्जाचे, परंतु कमी खर्चाचे खाद्य वापरा. योग्य प्रमाणात पोषण मिळाल्यास, कोंबड्या चांगल्या प्रकारे वाढतात आणि उत्पादन वाढते.

आजार प्रतिबंधक लसीकरण: कोंबड्यांना वेळोवेळी लसीकरण करून आजारांची शक्यता कमी करा. यामुळे उपचार खर्चात बचत होईल आणि मृत्यू दर कमी होईल.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर: नवीन तंत्रज्ञान आणि उपकरणांचा वापर करून काम सोपे आणि जलद करा, ज्यामुळे श्रम आणि वेळेची बचत होईल.

पाणी व्यवस्थापन: शुद्ध पाण्याची योग्य व्यवस्था ठेवा. पाणी पुरवठा स्वयंचलित करून अनावश्यक पाणी वाया जाण्यापासून वाचवा.

योग्य जागेचा वापर: कोंबड्यांची गर्दी न करता त्यांना पुरेशी जागा द्या, यामुळे त्यांचे आरोग्य चांगले राहील आणि उत्पादकता वाढेल.

स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण: शेड्सची आणि उपकरणांची नियमित स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण करा, ज्यामुळे आजारांचा प्रादुर्भाव कमी होईल.

श्रम व्यवस्थापन: कुशल आणि अनुभवी कामगारांची निवड करा, ज्यामुळे उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर कुशलता येईल आणि श्रम खर्च कमी होईल.

सौर ऊर्जा वापर: वीजखर्च कमी करण्यासाठी सौर ऊर्जेचा वापर करा, ज्यामुळे विजेच्या बिलात मोठी बचत होऊ शकते.

कचऱ्याचा पुनर्वापर: कोंबड्यांचा खत म्हणून वापर करून शेतीत वापरा किंवा विकून अतिरिक्त उत्पन्न मिळवा.

या सर्व गोष्टींचा विचार करून काम केल्यास कुक्कुटपालन व्यवसायात खर्चात बचत होऊ शकते आणि नफ्यात वाढ होईल.

## आरोग्य संपदा — आहार विशेष

# जेवणाआधी किती वेळ पाणी प्यायले पाहिजे?

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक** जेवण जेवण्याच्या ३० मिनिटेआधी पाणी प्यायल्याने पाचन योग्य पद्धतीने होते. सोबतच वजन घटवण्यासही मदत मिळते. तसेच पाचकरस बनण्यास मदत होते यामुळे पचनास मदत होते. यामुळे तुम्ही कमी प्रमाणात कॅलरीज खातात. जे लोक जेवणाआधी पाणी पितात त्यांचे वजन इतरांच्या तुलनेने वेगाने कमी होते. जेवणाच्या ३० मिनिटे अथवा ९० मिनिटांआधी थंड पाणी प्यायल्याने चयापचय क्रिया सुधारते. जेवणाच्या आधी खूप पाणी प्यायल्याने पोटात ॲसिड पातळ होऊ शकते आणि प्रोटीन तसेच मायक्रोन्यूट्रिएंट्स पचवण्यास कठीण होते.



**एका व्यक्ती किती आणि कधी पाणी प्यायले पाहिजे?**

पाणी शरीरासाठी अतिशय फायदेशीर आहे. सोबतच यामुळे अनेक आजार दूर होतात. कोणताही मोसम असो स्वत:ला हायड्रेट ठेवणे गरजेचे असते.

तज्ज्ञांच्या मते जेवल्यानंतर तुम्ही लगेचच पाणी पित असाल तर त्याचा वाईट परिणाम पचनावर होते. असे केल्याने योग्य पद्धतीने पचन होत नाही आणि अनेक आजार होतात.

**जेवल्यानंतर कधी प्यावे पाणी**

तज्ज्ञांच्या मते जेवल्यानंतर कमीत कमी ३० मिनिटे आधी पाणी पिऊ शकता. जेवल्यानंतर आणि पाणी पिण्याच्या आधी वॉक फायदेशीर ठरतो. असे केल्याने जेवण सहज पचते. तसेच अनेक समस्यांपासून बचाव होतो.

# तूर पिकातील मर रोगाच्या व्यवस्थापनासाठी अशा करा उपाययोजना

## कृषी विशेष

**विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्रामध्ये तूर हे महत्वाचे कडधान्य पीक आहे. तूर पिकामध्ये मर, फायटोप्थोरा आणि वांझरोग हे महत्वाचे रोग आहे. बदलत्या वातावरणामुळे व एकच एक पीक घेत असल्यामूळे तूर पीक जैविक व अजैविक घटकाला बळी पडत आहे.

जास्त पाऊस पडत असल्यामुळे तूर पिकावर फायटोप्थोरा व मर रोगांचा प्रादुर्भाव होत आहे. या रोगाची लक्षणे व त्यावरील उपाययोजना खालीलप्रमाणे आहे.

**मर रोगाची लक्षणे**

– हा रोग फ्युजारियम उडम या जमिनीत वास्तव्य करणाऱ्या बुरशीमुळे होतो. तूर पिकामध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव रोपावस्थेपासून ते शेंगा धरण्याच्या अवस्थेपर्यंत होतो.

– जमिनीचे तापमान २५ ते २८ अंश सेल्सिअस व ओलावा २० ते २५ टक्के असल्यास मर रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो.

– शेंगा पक्व होण्याच्या कालावधीत प्रादुर्भाव झाल्यास उत्पादनात मोठी घट येते.

– पानाच्या शिरा पिवळ्या होतात व पाने पिवळी पडतात. झाडाचे शेंडे मलूल होतात व कोमेजतात.

– जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असताना सुद्धा पाण्याचे वहन या बुरशीच्या प्रादुर्भावामुळे थांबल्याने झाडाच्या वरच्या बाजूला भागाला पाणी पोहोचत नसल्यामुळे पाने पिवळी पडतात व नंतर झाड हिरव्या स्थितीत वाळते.

– जमिनीलगतच्या खोडाचा भाग काळ्या रंगाचा बनतो. मूळ उभे चिरले असता मुळाचा मध्य भाग काळा दिसतो. यात बुरशीची वाढ झालेली दिसते.

– वाळलेल्या झाडाची पाने गळत नाही. तसेच रोगाची तीव्रता पीक फुलोरा तसेच शेंगा भरण्याच्या अवस्थेत जास्त असते. अंशतः मर हे सुध्दा मर रोगाचे लक्षण आहे.

– अशा झाडांच्या एक किंवा दोनच फांद्या वाळलेल्या असतात, उर्वरीत संपूर्ण झाड सामान्य स्थितीत असते.


तूर पिकात मर आलाय...

– रोगग्रस्त झाड उपडले असता ते सहज उपडून येत नाही त्याला उपडण्याकरीता निरोगी झाडा एवढीच ताकद लागते.

**नियंत्रणाचे उपाय**

१) उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरणी करून जमीन तापू द्यावी.

२) शेतामध्ये रोगट झाडे दिसताच त्वरीत उपटून टाकावी.

३) सलग तुरीच्या पिकापेक्षा तुरीसोबत ज्वारीचे आंतर पीक घेतल्यास मर रोगाचा प्रादुर्भाव कमी होतो.

४) पाणी साचणाऱ्या व पाण्याचा निचरा न होणाऱ्या जमिनीत तुरीचे पीक घेण्याचे टाळावे.

५) ज्या शेतामध्ये पूर्वी मर रोगाचा प्रादुर्भाव झालेला असेल अशा शेतात या पिकाची लागवड चार ते पाच वर्षांपर्यंत करू नये.

६) रोग प्रतिबंधक वाण उदा. बीडीएन ७१६, गोदावरी, बी.एस.एम.आर. ७३६, बी.एस.एम.आर. ८५३, आय.सी.पी.एल.- ८७११९, पीकेव्ही तारा इत्यादी वाणांचा वापर पेरणी करता करावा.

७) बियाण्यास पेरणीपूर्वी कार्बोक्झिम ३७.५ + थायरम ३७.५ टक्के डब्लू. एस. या मिश्र बुरशीनाशकाची ४ ग्रॅम त्यानंतर ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशकाची ४ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी.

८) पेरणीच्या वेळी २ किलो ट्रायकोडर्मा चांगल्या कुजलेल्या २०० किलो शेणखतात मिसळून द्यावा.

# रोहित पवार महाराष्ट्रात आग लावत सुटलेत, लोकसभेला जमलं म्हणून आता’, सदाभाऊ खोतांचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ सांगली–** सदाभाऊ खोत यांनी रोहित पवारांवर टीका करताना त्यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. खोत म्हणाले की, रोहित पवार महाराष्ट्रात आग लावत सुटले आहेत. त्यांच्या मते, पवारांनी लोकसभेच्या निवडणुकीत यश मिळवल्यानंतर आता ते राज्यात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.



सदाभाऊ खोत, जो एक प्रमुख राजकीय नेता आहेत, यांनी ही टीका रोहित पवारांच्या वाढत्या प्रभावाबद्दल किंवा त्यांच्या धोरणांबद्दल केली आहे. राजकीय क्षेत्रात अशा प्रकारचे हल्लाबोल सामान्य असतात, विशेषत: निवडणुका जवळ येत असताना.राजकीय मतभेद आणि टीका या सामान्य बाबी असून, यामुळे पुढील राजकीय संघर्ष आणि संवाद कसा होईल हे पाहणे महत्त्वाचे आहे.या महाराष्ट्रातून हे आग लावायचे धंदे बंद करा. लोकसभेला जमलं म्हणून आता जमेल ही भावना काढून टाका, अशी कडाडून टीका सदाभाऊ खोत यांनी सांगलीच्या शिराळा येथील रयत क्रांती कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी रोहित पवारांवर केली आहे.

# १७४ पानांच्या ‘डायरेक्शन’मुळे अडले पीएचडीचे प्रवेश: या आठवड्यात उमटणार अंतिम मोहोर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १७ अमरावती**

अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (जीएमसी) याच वर्षी सुरु करण्याची धडपड सुरु असून अधिष्ठाता (डीन) डॉ. किशोर इंगोले या आठवड्यात पुन्हा दिल्ली येथे जाणार आहेत.

१०० विद्यार्थी क्षमतेच्या या महाविद्यालयाची नवी इमारत बडनेरा-अंजनगाव बारी मार्गावरील अलियाबाद परिसरात बांधली जाणार आहे. परंतु त्यासाठी बराच काळ प्रतीक्षा करावी लागणार असल्याने सद्यस्थितीत हे महाविद्यालय जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) व संदर्भ सेवा रुग्णालयाच्या (सुपरस्पेशालीटी) परिसरात सुरु केले जाणार आहे. या दोन्ही रुग्णालयांतील आवश्यक त्या इमारती जीएमसीने ताब्यात घेतल्या असून त्यात जुजबी बदलही केले आहेत. त्याचवेळी जिल्हा सामान्य रुग्णालय हे प्रात्याक्षिकांसाठी वापरले जाणार आहे. या सर्व



बाबींसह अधिष्ठाता डॉ. इंगोले हे यापूर्वीच एकदा दिल्ली जाऊन आले असून आता पुन्हा एकदा ते दिल्लीवारी करणार आहेत.

सदर महाविद्यालयाला केंद्र आणि राज्य शासनाने यापूर्वीच मंजुरी दिली आहे. राज्य सरकारच्या अखत्यारितील बहुतेक बाबी पूर्णत्वास गेल्या असून प्राध्यापक व इतर अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्याही केल्या जात आहेत. दरम्यान या पुरक बाबींचा वस्तुनिष्ठ अहवाल राष्ट्रीय वैद्यकीय आयोगासमोर (एनएमसी) मांडून यावर्षीपासूनच महाविद्यालय सुरु केले जावे, असा प्रयत्न केला जात आहे. एबीबीएसची प्रवेश प्रक्रिया अलिकडेच सुरु झाली असल्याने ती अगदी प्राथमिक स्तरावर आहे. त्यामुळे आता जरी परवानगी मिळाली तरी महाविद्यालय यावर्षीपासूनच सुरु केले जाऊ शकते, असे डॉ. इंगोले यांचे म्हणणे आहे.

जीएमसीचे अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले म्हणाले की, जीएमसीचे वर्ग याच वर्षी सुरु व्हावेत, यासाठी माझा पाठपुरावा सुरु आहे.

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# पश्चिम विदर्भातून सर्वात सुंदर देखाव्यात आझाद हिंद गणेश मंडळाने बाजी मारत पटकाविला प्रथम क्रमांक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–** एबीपी माझा या वृत्तवाहिनी कडून पश्चिम विदर्भातून सर्वात सुंदर देखाव्यात आझाद हिंद गणेश मंडळ, अमरावती यांनी बाजी मारत प्रथम क्रमांक पटकाविला.दि.१५/०९/२०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता आझाद हिंद गणेश मंडळ यांना अमरावती परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक श्री रामनाथ पोकळे साहेब यांच्याहस्ते पारीतोषीक देण्यात आले. यावेळी गणेशोत्सवात आझाद हिंद मंडळाने सर्वात सुंदर प्रकारचे देखावा करून जे कार्य केले आहे त्या आझाद हिंद मंडळाची प्रशंसा व कौतुक विदर्भ स्तरावरून केली जात आहे. यावेळी माजी महापौर विलास इंगोले यांनी आझाद हिंद मंडळातील सर्व सदस्यांचे अभिनंदन केले. आझाद हिंद मंडळ दरवर्षी विविध प्रकारचे अनोखे देखावे सादरीकरण करतात आणि सदर देखावे अद्भुत सुद्धा व देखण्यासारखे असतात. यावर्षी आझाद हिंद मंडळाने श्री गुरुदेव दत्त देखावे सादरीकरण केले आहे. सदर देखावा पाहण्या करीता नागरीकांची भरपूर प्रमाणात गर्दी होत आहे. या देखाव्याने नागरीकांचे मन हिरावून घेतले आहे. आझाद हिंद मंडळाने श्री गुरुदेव दत्त हा देखावा तयार करून जो पुढाकार घेतला आहे सदर आझाद हिंद मंडळाचे कौतुक नागरीक करत आहे. अमरावतीकर या अद्भुत देखाव्याचे पाहणी करून आनंद घेत आहे. या देखाव्यात दत्तात्रेय ही तीन शिरे असलेली देवता औदुंबर वृक्षाखाली यज्ञकुंडासमोर अथवा अग्नीसमोर बसलेली दिसते. गळ्यात रुद्राक्षमाळा, अंगावर भस्माचे पट्टे, समोर चार कुत्री, मागे गाय असा परिवार दिसून येतो., स्वरूप दिगंबर म्हणजे फक्त पितांबर नेसलेले असा




अवस्थेत ध्यानस्थ बसलेले दिसतात. चार कुत्री हे चार वेद आणि शंकराचे भैरव मानले जातात. रुद्राक्ष, अंगावर भस्म यांवरून ते स्मशानात राहणाऱ्या शिवाचे ध्यान करत असल्याचे दिसते.या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष श्री दिलीपबाबू इंगोले, शहर काँग्रेसचे अध्यक्ष बबलुभाऊ शेखावत, शिवसेना महानगर प्रमुख पराग गुडधे, शहर राष्टवादी काँगेसचे अध्यक्ष डॉ प्रा. हेमंत देशमुख, संजय वाघ,कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाला सर्व श्री अनंतराव गुढे, माजी खासदार, अध्यक्ष सचिन हिवसे, कार्याध्यक्ष दीपक लोखंडे, स्वागताध्यक्ष प्रवीण मानेकर, उपाध्यक्ष डॉ मुस्तफा साबीर, डॉ महेंद्र गूढे, आकाश शिरभाते, सचिव सागर इंगोले कोषाध्यक्ष निलेश वानखडे, डॉ किशोर फुले, दिलीप कलोती, दिलीप दाभाडे, विवेक कलोती, माजी सभापती, ज्ञानेश्र्वर हिवसे, नंदू गुंबळे, शैलेश अग्रवाल किशोर कलोती, रामभाऊ चांवडे, राजु भेलें, भुषण पुसतकर, सुरेश रतावा, गजु राजगुरे, प्रमोद इंगोले, मयूर जलतारे, प्रवीण चौधरी, निलेश सराफ , संतोष चिखलकर, अनिकेत नवघरे, प्रथमेश बाखडे, परेश कोरे आकाश मोहोड, वेदांत डांगे, कृष्णा हिवसे, रेवण पुसतकर, अजय इंगोले, आर्यन ढोले, राजेश ढोले, सतीश बद्रे, सचिन कोहळे, मुन्ना दुलारे, अजय पुसतकर, पंकज सराफ, योगेश पुंड, संजय हिरपूरकर, राजेश जायदे, मनीष चौधरी,शेखर कुळकर्णी सुनील तिप्पट, नितीन सराफ राजु दोडके, श्याम शिनगारे, सुशील कथलकर, राहुल कथलकर, सनी महल्ले, ऋषिकेश गाडगे, राजा पिंजरकर, बाळासाहेब काशीकर, मुन्ना गुप्ता यांचे सह असंख्य कार्यकर्ते व हजारो नागरीक उपस्थित होते.

# धनगर आदिवासी नाहीतच; मग जीआर कसा काढता?

## ट्रायबल फोरमचा सवाल, मुंबई उच्च न्यायालयानेही नाकारले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**
अमरावती: अनुसूचित जमातीच्या सूचित 'धनगर' शब्द नाहीच. धनगर ही 'जात' आहे, 'जमात' नाही. मुंबई उच्च न्यायालयाने नाकारल्यानंतरही राज्य सरकार धनगर समाजाचा अनुसूचित जमातीच्या सूचित समावेश करण्यासाठी धनगर, धनगड एकच असल्याचा जीआर कसा काय काढता, असा आक्षेप ट्रायबल फोरमचे राज्य उपाध्यक्ष अजाबराव उईके यांनी घेतला आहे. धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यासाठी कायद्याच्या विहित पद्धतीचा अवलंब करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे. ही बाब चुकीची आहे. मताच्या राजकारणासाठी धनगर आणि आदिवासी समाजाची फसवणूक करू नका, असे आवाहन अजाबराव उईके यांनी राज्य सरकारला १६ सप्टेंबर रोजी पाठविलेल्या पत्राद्वारे केले आहे.



### डॉ. विकास महात्मे यांच्या प्रश्नाला सरकारचे उत्तर

धनगरांना अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे मिळावी म्हणून १६ नोव्हेंबर २०१६ रोजी राज्यसभेत तत्कालीन खासदार डॉ. विकास महात्मे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी 'एसटी' जमातीच्या यादीत क्र. ३६वर ओरॉन, धांगड असून, धनगर समूह राज्यात अनुसूचित जमातीच्या यादीत नाहीत, असे उत्तर त्यांना मिळाले होते.

१९११च्या जनगणनेमधील तक्ता क्रमांक ६ केवळ जातीचा आहे. त्यामध्ये क्रमांक ७वर धनगर 'जात' म्हणूनच नोंद आहे.

१९११ मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सी, सी. पी. ण्ड बेरार, मराठवाडा या तीन प्रातांत धनगर 'जात' म्हणूनच उल्लेख आहे. १९३१ची जनगणना जे. एच. हट्टन यांनी केली आहे. ते १९२९ ते १९३३ पर्यंत जनगणना आयुक्त होते. त्यांच्या जनगणनेचा खंड ३ मध्ये पान क्रमांक ६६वर हट्टन यांनी भटक्या जातीचा तक्ता दिलेला आहे. त्यामध्ये क्रमांक ४वर धनगर जात आहे. खंड दोनमध्ये पान क्रमांक १६६ वर जात क्रमांक ३०वर 'गडरीया' नावाच्या मुख्य जातीची नोंद आहे. त्यांच्या उपजातीची नावे भाखड, धनगर आहे. 'धनगर ही जात आहे, जमात नाही.'

# अखेर आमदार संजय गायकवाड यांच्याविरोधात गुन्हे दाखल, कॉंग्रेस आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ बुलढाणा**
शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्या काँग्रेस नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या संदर्भातील विधानावरून जिल्हा काँग्रेस चांगलीच आक्रमक झाली. संजय गायकवाड यांच्याविरोधात गुन्हा दाखल करा, अशी मागणी करीत काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शहर पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. यानंतर सोमवारी रात्री उशिरा पोलिसांनी आमदार संजय गायकवाड यांच्याविरोधात गुन्हे दाखल केले. यामुळे शहरात राजकीय तणाव निर्माण झाल्याचे चित्र आहे. राहुल गांधी यांनी विदेशात जाऊन आरक्षणासंदर्भात



केलेल्या वक्तव्याविरोधात बोलताना संजय गायकवाड यांनी सोमवारी प्रक्षोभक विधान केले होते. राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्याला ११ लाखांचे बक्षीस देईल, असे त्यांनी जाहीर केले होते.संजय गायकवाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारे तक्रार निवेदन देण्यासाठी काँग्रेस नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते शहर पोलीस ठाण्यात दाखल झाले. आंदोलनात काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे, माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ, विजय अंभोरे, महिला काँग्रेसच्या जिल्हा अध्यक्ष मंगला पाटील, प्रदेश सचिव जयश्री शेळके, सुनील सपकाळ, रिजवान सौदागर, बुलढाणा शहराध्यक्ष दत्ता काकस, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने सहभागी झाले होते.तत्पूर्वी, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष संजय राठोड यांनीही बुलढाणा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. सर्व काँग्रेस पदाधिकारी यांच्यावतीने तक्रार दाखल करण्यात आली. यात आमदार गायकवाड यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.बुलढाणा शहर पोलिसांनी अखेर सोमवारी रात्री उशिरा आमदार संजय गायकवाड यांच्याविरुद्ध दखलपात्र गुन्हे नोंदवले. यानंतर ठिय्या आंदोलन मागे घेत 'एफआयआर'ची प्रत घेऊनच काँग्रेस नेते पोलीस ठाण्याच्या बाहेर पडले. काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हा कार्याध्यक्ष समाधान दामधर यांच्या तक्रारीवरून आमदार गायकवाड यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेचे कलम १९२, ३५१(२), ३५२(३), ३५२(४) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले.

### काँग्रेस नेत्यांच्या तीव्र प्रतिक्रिया



गुंड कोणाला म्हणायचं मुख्यमंत्र्यांना गुंड म्हणायचं की त्यांच्या आमदारांना गुंड म्हणायच..गृहमंत्र्यांना गुंड म्हणायचं की त्यांच्या नेत्यांना गुंड म्हणायचं..हा महाराष्ट्र आहे या महाराष्ट्रा सोबत छेडखानी करने चुकीचे आहे.जे सत्ताधारी आहेत त्याना दंगल करायची आहे.आता तेवढाच पर्याय त्यांच्या कडे आहे. खबरदार महाराष्ट्रला इजा केली तर महाराष्ट्र तुम्हाला माफ करणार नाही आहे.. कुठल्याही परिस्थितीत संजय गायकवाड वर गुन्हा दाखल झाला पाहिजे.सुमोटो कारवाई करा –

**आ. यशोमती ठाकूर**

### गायकवाड यांना तातडीने अटक करा, – किशोर बोरकर



लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्यांस ११ लाखांचे बक्षिस जाहीर करणारे मस्तवाल आमदार संजय गायकवाड या गुंड प्रवृत्तीच्या आमदारांचा जाहीर निषेध महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी केला असून ते म्हणाले कि, जननायक राहुल गांधी यांची दिवसेंदिवस वाढत चाललेली लोकप्रियता भाजपा व त्यांच्या मित्रपक्षाला सहन होत नाही, त्यामुळे निराश झालेले सत्ताधारी राहुलजीच्या वक्तव्याची मोडतोड करून त्यांची खोटी बदनामी करीत असल्याचा आरोप किशोर बोरकर यांनी केला असून ते म्हणाले की,राज्यात,व देशात जेव्हापासून भाजपाचे सरकार आल्यापासून, महात्मा गांधींच्या मारेकऱ्यांचे पुतळे उभारणे,देशाचे संविधान बदलविण्यासाठी आम्ही सत्तेत आलो आहोत,व भाजपाच्या माजी आमदाराने राहुल गांधी यांना जीवे मारण्याची जाहीरपणे धमकी देणे,हि सर्व काळे क्रुत्य देशाच्या संविधानाची पायमल्ली करणारे असुन भाजपा अशा देशविघातक प्रवुत्तीस प्रोत्साहन देत असल्याचे उघडपणे देश बघत आहे.मस्तवाल आमदार संजय गायकवाड यांचा बंदोबस्त काँग्रेस कार्यकर्ते एका क्षणात करू शकतात, परंतु ते आमचे संस्कार नाहीत.असा सज्जड दम किशोर बोरकर यांनी दिला असून मस्तवाल आमदार संजय गायकवाड हे अजुनही आपल्या देशविघातक वक्तव्यावर ठाम असल्याचे प्रसार माध्यमातुन प्रसिद्ध झाले आहे.तेव्हा आमदार संजय गायकवाड यांना तातडीने अटक करावी, अशी मागणी किशोर बोरकर यांनी केली आहे.

# विद्यार्थ्यांना संविधानाची संपूर्ण माहिती मिळणार :चांदूर रेल्वे येथे आ. प्रताप अडसड यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–** 'स्वतंत्र भारताची सार्वभौम राज्यघटना लिहून त्या घटनेचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिल्पकार ठरले असून,या घटनेने आपणास सर्व प्रकारची ताकद दिली आहे. या घटनेच्या आधारे भारत देश कसा चालवला जातो, याचे दर्शन घडते. देशातील सर्व जाती, धर्म, पंथ, लिंग भेद आदीपासून संरक्षण देणारी राज्यघटना डॉ. बाबासाहेबांच्या हातून लिहिली गेली आहे. संविधान मंदिराच्या निर्मितीमुळे आता आयटीआयमधील विद्यार्थ्यांना भारतीय राज्यघटनेविषयी माहिती मिळणार आहे,' असे प्रतिपादन आमदार प्रताप अडसड यांनी केले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये आयोजित संविधान मंदिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या प्रसंगी मंचावर मुख्य अतिथी म्हणून आमदार प्रताप अडसड, प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अर्जुन सरदार, प्रभारी प्राचार्य धनंजय भोगे यांची उपस्थिती होती. यापूर्वी तीन दिवसीय संविधान महोत्सवामध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, प्रश्नमंजुषा घेण्यात आली. या दरम्यान वक्ते प्रेमचंद



अंबादे, अर्जुन सरदार आदींनी मार्गदर्शन केले. दररोज संविधान उद्देशिकेचे वाचन शिल्पा प्रमोद वारकड यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता आयटीआयचे शिल्प निदेशक संजय गुल्हाने, प्रमोद वारकड, प्रफुल्ल गावंडे, प्रशांत पाचपोर, श्रीकांत ठाकरे, विनोद रेवस्कर, लिलाधर दांदडे, प्रकाश ठाकरे, ऋतिक सावदे, अविनाश देवतारे, प्रवीण डोंगरे, प्रशांत टांगले, शरद बेहरे, सुरज चांदूरकर, सुधाकर कांबळे, जयश्री रंगारी, वृषाली भडके, कर्मचारी प्रवीण पुंड, नंदा आत्राम, तेजस इमले, जी. एच. राठोड, रामु कनोजे, एस. पी. रामटेके, स्नेहल खडसे, परिमल बांबल यासह प्रशिक्षणार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद वारकड यांनी केले. प्रकाश ठाकरे, लिलाधर दांदडे यांनी आभार मानले.

# जिल्ह्यात लेझर लाईटवर बंदी; दुर्घटना टाळण्यासाठी निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**
गणेश विसर्जन मिरवणुक ध्वनिक्षेपकावर लावण्यात येणाऱ्या लेझर बीम लाइटवर पोलिसांनी बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. कोणी लेझर बीम लाइट लावल्यास, कायदेशीर कारवाई करण्यात येईल,' असा इशारा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी दिला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम–१६३(१) अन्वये) तशी अधिसुचनाच त्यांनी पारित केली आहे. जिल्हयात सार्वजनिक गणेश मंडळांकडून वेगवेगळ्या तारखेला मोठया प्रमाणात विसर्जन मिरवणुकांचे आयोजन केले जात आहे. या मिरवणुकीमध्ये लेझर लाईटचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. यावर्षी कोल्हापुर जिल्हयातील उचगाव परिसरात मणेरमळा येथे गणेश आगमनावेळी मिरवणूक बघण्याकरीता आलेल्या भाविकांच्या डोळयावर लेझर लाईट पडल्याने त्या व्यक्तीच्या डोळयाचा पडदा तसेच बुबुळाला ईजा झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापुर्वी गतवर्षी यवतमाळ जिल्यातील उमरखेड येथे ईद–ए–मिलाद मिरवणुकीदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे असलेल्या नगर परिषद व्यापारी संकुलाच्या इमारतीच्या मध्यभागी शिवराजमुद्रा व शिवाजी महाराज यांचे अर्धपुतळयावर डीजेवरुन लेझरच्या सहाय्याने मिनार व मशिदीचे चित्र तयार करुन हिंदु धर्माच्या धार्मिक भावना दुखावून जातीय तेढ निर्माण होईल, अशी क्लिप सोशल मिडीयावर व्हायरल झाल्याने तेथे तणावपुर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. त्याअनुषंगाने एसपी विशाल आनंद यांनी लेझर लाईटवर बंदी घातली आहे.





१६ ते २१ सप्टेंबर या कालावधीत गणेश उत्सव व ईद ए मिलाद मिरवणुकीमध्ये लेझर लाईटच्या वापरास प्रतिबंध करण्यात येत आहे. या आदेशाचे उल्लंघन करणा–या व्यक्ती फौजदारी कारवाईस पात्र राहतील. तशी अधिसुचना रविवारी काढली.

– **विशाल आनंद,** पोलीस अधीक्षक

### २१ सप्टेंबरपर्यंत प्रतिबंध

जिल्हयात २१ सप्टेंबरपर्यंत गणेश विसर्जन होणार आहे. तर, १६ ते २१ सप्टेंबर या कालावधीमध्ये ईद ए मिलाद सण मोठया उत्साहाने साजरा केला जातो. त्या दरम्यान सार्वजनिक गणेश मंडळाकडून व ईद ए मिलाद कमिटीकडुन मोठया प्रमाणात मिरवणुकांचे आयोजन केल्या जाते. या मिरवणुकांमध्ये लेझर लाईटचा वापर ते मोठया प्रमाणात करीत आहेत. त्यामुळे मिरवणुकीमध्ये लेझर लाईट वापरास प्रतिबंध करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करत भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३(१) नुसार जिल्हयात १६ ते २१ सप्टेंबर या कालावधीत लेझर लाईटवर प्रतिबंध घालण्यात आला आहे.

# ८५ जागा खात्रीच्या, भाजपने केली कॅटेगरी

## विधानसभेसाठी पक्षाची रणनीती

## गेल्या वेळी जिंकलेल्या २५ जागांबाबत चिंता





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीत जिंकण्याचा विश्वास असलेल्या ८५ जागा भाजपने काढल्या असून, त्यावर लक्ष केंद्रित करताना गेल्यावेळी जिंकलेल्यांपैकी २५ जागांवर यावेळी अधिक मेहनत करावी लागणार असल्याचा सूर पक्षाच्या विविध बैठकांमध्ये व्यक्त होत आहे. विशेषत: भाजप-रा. स्व. संघ यांच्या बैठकांमध्ये या आधारे रणनीती आखली गेली आहे. या बैठकांमध्ये उपस्थित असलेल्या एका ज्येष्ठ नेत्याने ही माहिती दिली. विधानसभेच्या २०१९ मधील निवडणुकीत भाजपने १०५ जागा जिंकल्या होत्या. त्यावेळी भाजप-शिवसेना अशी युती होती. २०१४ च्या तुलनेत पक्षाच्या १७ जागा कमी झाल्या होत्या. सर्वाधिक फटका विदर्भात बसला होता. यावेळी भाजप-संघाच्या तसेच केवळ भाजपच्या ज्या बैठकी सुरू आहेत त्यात निवडून येण्याच्या शक्यतेच्या आधारे ए, बी आणि सी अशा तीन कॅटेगरी करण्यात आल्या आहेत. २०१४, २०१९ ची विधानसभा निवडणूक आणि २०१४ पासूनच्या तीन लोकसभा निवडणुकांत भाजपला बूथनिहाय झालेले मतदान आणि यावेळी किती मते मिळू शकतात याचा अंदाज या आधारे या कॅटेगरी निश्चित करण्यात आल्या आहेत.

गेल्यावेळच्या १०५ पैकी किमान २५ जागा अशा आहेत, की ज्या जिंकण्यासाठी अधिक लक्ष केंद्रित करावे लागेल, असे भाजप पक्षसंघटनेत वरिष्ठपदावर असलेल्यांना वाटते.

ज्या ८५ जागांवर जिंकण्याचा विश्वास आहे, त्या सर्वच गेल्यावेळी जिंकलेल्या आहेत असे नाही. त्यातही पाच-सात जागा यावेळी धोक्यात आहेत; पण गेल्यावेळी हरलेल्या पाच-सात जागा यावेळी जिंकता येऊ शकतात, असा फीडबॅक पक्षसंघटनेत महत्त्वाच्या पदांवर असलेल्यांनी दिला.गेल्या वेळी ज्या जागा कमी फरकाने जिंकल्या होत्या त्या जागाही भाजपने धोक्याच्या मानल्या आहेत. महायुतीमध्ये भाजप १५५ ते १६० जागा लढण्याची शक्यता आहे. त्यातील १२५ जागा जिंकण्याचे उद्दिष्ट पक्षाने ठेवले असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

भाजपचे निवडणूक प्रभारी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांना महाराष्ट्रात विशेष जबाबदारी देण्यात आलेल्या गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणामधील बड्या नेत्यांची चार तासांची बैठक सोमवारी घेतली. यावेळी सर्व नेत्यांना पुढील जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले.महायुतीतील दोन मित्रपक्षांशी समन्वय राखण्याची जबाबदारी भाजपने ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्याकडे दिली आहे. महाजन यांनी 'लोकमत'ला सांगितले की, विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने तिन्ही पक्षांची प्रत्येक जिल्ह्यात एक समन्वय समिती तयार केली जाईल. विधानसभा पातळीवरही समन्वयाची यंत्रणा असेल.भूपेंद्र यादव यांनी अनुसूचित जाती आघाडी आणि भाजप युवा मोर्चा यांची स्वतंत्र आढावा बैठक घेतली.

भाजप युवा मोर्चाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्याला बैठकीला उशिरा पोहोचल्याने यादव यांनी चांगलेच झापले. युवा मोर्चाचे प्रभारी प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी सारवासारव केली.अनुसूचित जाती आघाडीच्या बैठकीत एका आमदारालाही भूपेंद्र यादव यांनी खडे बोल सुनावल्याची माहिती आहे.

# शिक्षक बँकेच्या संचालक अपात्रता प्रकरणाच्या सुनावणीला तारीख पे तारीख

## आता २६ सप्टेंबरला होणार युक्तिवाद




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती**

येथील जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेच्या पाच संचालकांच्या अपात्रता प्रकरणाची सुनावणी पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आली असून ती आता २६ सप्टेंबरला होणार आहे. बँकेच्या हिताविरुद्ध कारवाया केल्याचा ठपका ठेऊन २४ सदस्यीय संचालक मंडळाने गेल्या जानेवारीत पाच जणांना अपात्र केले. त्यानंतर हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठात पोचले. त्यावर आता २६ सप्टेंबरला सुनावणी होईल.

याप्रकरणाची सुनावणी १२ सप्टेंबर रोजी निश्चित करण्यात आली होती. परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे ती आता २६ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. अपात्र ठरविण्यात आलेल्या संचालकांमध्ये मंगेश खेरडे, प्रभाकर झोड, गौरव काळे, मनोज चोरपगार आणि संजय नागे या पाच जणांचा समावेश आहे. दरम्यान त्यांच्यावरील अपात्रतेची कारवाई मागे घेण्यात यावी, असा प्रस्ताव शिक्षक बँकेच्या अलिकडेच पार पडलेल्या आमसभेत घेण्यात आला. परंतु सध्या हे प्रकरण न्यायप्रवीष्ट झाले असल्याने न्यायालयाचा निर्णयच अंतीम मानला जाणार आहे.

दोन वर्षांपूर्वी पार पडलेल्या शिक्षक बँकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत हे पाचही संचालक वेगवेगळ्या तालुका मतदारसंघांतून विजयी झाले होते. मात्र ते विरोधी बाकावर असल्याने संचालक मंडळाने त्यांच्यावर ४ जानेवारी २०२४ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेतून कारवाईचा बडगा उगारला. मुळात ही कारवाई सूडबुध्दीने करण्यात आल्याचे अनेक सदस्यांचे म्हणणे आहे. त्यामुळेच माजी अध्यक्ष किरण पाटील यांनी गेल्या आमसभेत ही कारवाई परत घेण्याची मागणी केली. त्यांच्या प्रस्तावाला सभेने एकमताने पारितही केले.दरम्यान आता २६ सप्टेबरच्या सुनावणीत काय होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सत्तापक्षातर्फे अध्यक्ष गोकुलदास राऊत आणि त्यांचे १९ समर्थक संचालक या प्रकरणाची दुसरी बाजू न्यायालयासमोर मांडत आहे.

# रा.स्व.संघाच्या विजयादशमी कार्यक्रमात इस्त्रोचे डॉ. राधाकृष्णन प्रमुख पाहुणे

## १२ ऑक्टोबरला रेशमबाग मैदानावर होणार कार्यक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७नागपूर,-** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस)ने आपल्या वार्षिक 'विजयादशमी' कार्यक्रमात इस्रोचे माजी प्रमुख राधाकृष्णन यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रण दिले आहे. सोमवारी संघाने एक्सवर एका पोस्टद्वारे ही माहिती दिली. विजयादशमी उत्सव हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सर्वात महत्वाचा कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ७:४० वाजता रेशमबाग मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचं संबोधन होईल. डॉ . राधाकृष्णन यांनीच भारताला पहिल्याच प्रयत्नात मंगळावर नेले. त्यांचे पूर्ण नाव डॉ. कोप्पिलिल राधाकृष्णन असून ते प्रसिद्ध भारतीय शास्त्रज्ञ आहेत. राधाकृष्णन यांचा जन्म २९ ऑगस्ट १९४९ रोजी केरळमधील इरिंजलकुडा येथे झाला. डॉ. राधाकृष्णन यांनी वर्ष १९७० मध्ये केरळ विद्यापीठातून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केली. पुढच्या वर्षी म्हणजे वर्ष १९७१ मध्ये त्यांनी तिरुवनंतपुरममधील विक्रम साराभाई स्पेस सेंटरमध्ये एव्हीओनिक्स इंजिनीअर म्हणून इस्रोमध्ये काम करायला सुरुवात केली. तथापि, नंतर त्यांना विक्रम साराभाई स्पेस सेंटरचे संचालकही करण्यात आले.

# अवघड गणित होणार सोपे! शिक्षण विभाग शाळांमध्ये राबविणार गणित सात्मीकरण प्रणाली



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मुंबई-** गणित विषय म्हटले की, विद्यार्थ्यांची बऱ्याचदा भंबेरी उडालेली दिसते. गेल्या काही वर्षांमध्ये शिक्षण विभागाकडून प्रकाशित झालेल्या राष्ट्रीय सर्वेक्षण अहवालातून विद्यार्थ्यांमध्ये हा विषय इतर विषयांच्या तुलनेने अवघड आहे असे आढळून आले आहे.

विद्यार्थ्यांमधील गणिताची ही भीती कमी करण्यासाठी शिक्षण विभागाकडून गणित सात्मीकरण प्रणालीचा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडक शाळांमध्ये राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी शिक्षण विभागाकडून राबविण्यास ४ कोटींच्या निधीची मान्यता देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांची गणित विषयाबाबतची भीती कमी व्हावी व त्यांच्या आकलन पातळीत वाढ व्हावी यासाठी अध्यापन व अध्ययन पद्धतीत शैक्षणिक तंत्राचा वापर गरजेचा आहे. यासाठी प्रयत्न शिक्षण विभागाकडून सुरू असून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून (एससीसीईआरटी) गणित सात्मीकरण प्रणालीचा प्रायोगिक तत्त्वावर वापर करण्यात आला.दरम्यान, एससीईआरटीने ही प्रणाली राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडक शाळांमध्ये पथदर्शी स्वरूपात राबविण्यास हरकत नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील काही निवडक मराठी माध्यमाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये प्रयोगिक तत्त्वावर या प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी निविदा प्रक्रिया राबवण्याची आणि त्याचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी एससीईआरटीवर सोपवण्यात आली आहे.

**सात्मीकरण प्रणाली म्हणजे नेमके काय?**

गणिताची भीती दूर करण्यासाठी एससीईआरटी प्रयत्न करत आहेत. त्यासाठी गणिताचे ई-साहित्य तयार करण्यात आले आहे. गणितात भौमितिक सिद्धांत, समीकरणे असतात. बीजगणितीय सूत्रे फळ्यावर विद्यार्थ्यांना समजावून शिकवावी लागतात. साहित्य, सूत्रांच्या एकत्रीकरणातून विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# आम्ही कोणाला सोडत नाही; तत्काळ ठोकून काढतो, देवेंद्र फडणवीसांचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७पुणे: -** पुण्यात गुन्हेगारी वाढत चालली आहे. आता तर दिवसाढवळ्या गोळीबाराच्या घटना वाढू लागल्या आहेत. कोणालाही कसलीच भीती राहिली नसल्याचे दिसून आले आहे. वनराज आंदेकर खून प्रकरण त्यानंतर झालेला व्यावसायिकावरील गोळीबार, कोयत्याने वार, गटांमध्ये वाद होऊन मृत्यू अशा घटनांमुळे पुणे शहर हादरले आहे. याबाबतच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता त्यांनी गुन्हेगारांना थेट इशारा दिला आहे. कुठलीही घटना घडली तरी आम्ही कोणाला सोडत नाही. तत्काळ शोधून काढतो, ठोकून काढतो, जेलमध्ये टाकतो. त्यामुळे पुणे सुरक्षित राहिले पाहिजे यासाठी विशेष प्रयत्न सुरू केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले आहे. पुणे-हुबळी आणि पुणे कोल्हापूर आणि नागपूर-सिकंदराबाद या तीन वंदे भारत एक्स्प्रेसचे लोकार्पण पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे स्थानकावरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवण्यात आला. यानंतर माध्यमांशी ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रासाठीच्या तीन वंदे भारत ट्रेनची भेट दिली आहे. वंदे भारत एक्स्प्रेस ही अतिशय उत्तम आणि अत्याधुनिक सुविधा असलेली आंतरराष्ट्रीय दर्जाची ट्रेन आहे. महाराष्ट्रातील प्रवाशांना याचा सुखकर प्रवासासाठी फायदा होणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले आहे. धनगर आरक्षण संदर्भात काल बैठक झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चर्चा करून रोड मॅप बनवला आहे. मी दुसऱ्या बैठकीत असल्याने त्या बैठकीला नव्हतो. मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्या दिशेने पुढे चाललो आहोत.

# मोर्शी येथे गणेश विसर्जनासाठी कृत्रिम तलाव

## वारसा संस्थेचा उपक्रम:



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मोर्शी-** पर्यावरणाचा ऱ्हास न होता गणेश विसर्जन धार्मिक पद्धतीने व्हावे, जलप्रदूषण होऊ नये यासाठी शहरातील वारसा संस्थेकडून गणेश विसर्जनाकरिता सिंभोरा धरणा लगतच कृत्रिम तलाव निर्माण करण्यात आला असून तेथेच नागरिकांनी गणेश विसर्जन करावे, असे आवाहन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. मागील पाच वर्षांपासून वारसा संस्थेतर्फे सिंभोरा रस्त्यावरील नरिमन पॉईंट येथे गणेश मुर्तीचे विसर्जन करण्याकरिता कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात आली असून त्याचे भूमीपूजन राहुल चौधरी, राहुल उगले, नगर परिषदेच्या अभियंता संपदा देशमुख, चेतन काळमेघ यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी वारसा संस्थेचे अध्यक्ष अभिलाष व्यवहारे, कुणाल भिवगडे, नितीन चिखले, वैभव मलवार, प्रशांत चारे, अमन उंडे, रोशन माळोदे, विवेक घुलक्षे उपस्थित होते. नागरिकांनी आपल्या घरी स्थापन केलेली श्री गणेशाची मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावामध्ये करावे, असे आवाहन वारसा संस्थेद्वारे करण्यात आले आहे.

# मविआचा ३३ जागांवर पेच, विदर्भातील चित्र; २९ जागांवर एकाच पक्षाने दावा केल्यामुळे मार्ग मोकळा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७नागपूर :**

महाविकास आघाडीच्या विदर्भातील जागा वाटपात सुमारे ५० टक्के जागांवर शिक्कामोर्तब झाले आहे. विदर्भातील ६२ पैकी २९ जागांवर कोणत्याही एकाच पक्षाने दावा केला असल्यामुळे या जागांचा मार्ग मोकळा झाला आहे. उर्वरित ३३ जागांवर एकापेक्षा जास्त पक्षांनी दावा केला असल्यामुळे या जागांवरील पेच कायम आहे.

विदर्भातील जागा वाटपात काँग्रेस नमते घेण्यास तयार नाही. तीनही पक्षांच्या नेत्यांमध्ये आजवर झालेल्या बैठकीत २९ जागा निकाली निघाल्या आहेत. यामध्ये काँग्रेसच्या २४ जागा आहेत. शरद पवार गटाच्या चार, तर उद्धवसेनेच्या वाट्याची एकमेव जागा 'क्लीअर' झाली आहे. नागपूर जिल्ह्यातील काटोल, सावनेर, कामठी, दक्षिण – पश्चिम नागपूर, पश्चिम नागपूर, उत्तर नागपूर, मध्य नागपूर या मतदारसंघांमध्ये एकाच पक्षाने दावा केला. प्रदेश काँग्रेसच्या एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने या संबंधाने दुजोरा दिला आहे.

### या जागांचा मार्ग मोकळा

नागपूर : काटोल, सावनेर, कामठी, दक्षिण-पश्चिम नागपूर, पश्चिम नागपूर, उत्तर नागपूर, मध्य नागपूर

भंडारा : साकोली

गोंदिया : आमगाव

चंद्रपूर : चंद्रपूर, ब्रह्मपुरी, चिमूर, राजुरा व वरोरा

वर्धा : देवळी

अमरावती : तिवसा, अमरावती, मोर्शी व बडनेरा

यवतमाळ : आर्णी, राळेगाव, उमरखेड, पुसद

अकोला : बाळापूर, अकोला व अकोला पूर्व

बुलढाणा : मलकापूर, खामगाव व शिंदखेडा राजा

वाशिम : रिसोड

# नियुक्त्या देऊन नेत्यांची नाराजी दूर

## शिरसाट सिडकोचे अध्यक्ष, आयोगाच्या अध्यक्षपदी अडसूळ



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मुंबई -** महाराष्ट्रातील नेत्यांची नाराजी दूर करण्यासाठी आणि पक्षांतर्गत समतोल राखण्यासाठी काही महत्त्वाच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. या अंतर्गत उदय शिरसाट यांची सिडको (सिटी अँड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) चे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर हरिभाऊ अडसूळ यांची महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्त्या नेत्यांच्या असंतोषाला शांत करण्यासाठी केल्या गेल्या असल्याचे मानले जात आहे. अशा नियुक्त्यांमुळे नेत्यांमध्ये असलेली नाराजी दूर करण्याचा प्रयत्न झाला आहे, ज्यामुळे पक्षातील अंतर्गत वातावरण सुधारण्याची अपेक्षा आहे.

# भक्तांच्या गणपती विसर्जनात आ. रवी राणा ही सहभागी....



अमरावती शहराच्या छत्री तलाव परिसरात आज सकाळ पासून आपल्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यासाठी गर्दी केली आहे.भक्तांच्या या भावपूर्ण गणरायाला निरोप देण्यासाठी आ. राणा ही छत्री तलावावर उपस्थित झाले प्रत्येक भक्तांची आस्थेने विचारपूस करीत त्यांच्या उत्साहात सहभागी झालेत या त्यांनी प्रशासनातर्फे करण्यात आलेल्या व्यवस्थेची संपूर्ण पाहणी करीत समाधान ही व्यक्त केले.

# तिवसा तालुक्यात सोयाबीन पिकावर रोगाचे आक्रमण:शेतकरी हवालदिल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अमरावती**


तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांना सध्या सोयाबीन पिकावर रोग आल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रोगामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून, पिकांचे उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे. निसर्गाच्या अनियमित लहरीपणामुळे आधीच शेतकरी हवालदिल होते, त्यात आता या रोगामुळे त्यांच्यासमोर अधिक आव्हाने उभी राहिली आहेत. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज घेऊन पिके लावली होती, परंतु या आक्रमणामुळे त्यांच्या कष्टाचे फळ मिळणे कठीण झाले आहे. तिवसा तालुक्यात अनेकांच्या शेतात सध्या सोयाबीनवर रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे सोयाबीन पिकाला मोठा फटका बसला असून शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. तालुक्यातील गुरुकुंज मोझरी येथील शेतकरी योगेश टाले यांनी आपल्या अडीच एकर शेतात सोयाबीन पेरले होते. परंतु, ऐन फुलोऱ्यात आलेल्या सोयाबीनवर रोगाचा प्रादुर्भाव झाला. त्या रोगामुळे शेतकरी योगेश टाले यांच्या अडीच एकरामधील सोयाबीन पीक पिवळे पडले आहे. परिणामी सोयाबीन पिकाला लागलेल्या शेंगा पूर्णपणे पोचट असून त्यामुळे जवळपास ५० हजार रुपयांचे नुकसान या शेतकऱ्याचे झाले आहे पंचनामे करुन मदत द्यावी; शेतकऱ्यांची सरकारकडे मागणी : तिवसा तालुक्यात अनेक ठिकाणी सोयाबीनवर रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. याचा शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. प्रशासनाने याचे तत्काळ पंचनामे करून आर्थिक मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. पिकावर



पिवळ्या रंगाचे चट्टे रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास सोयाबीनच्या पानाच्या मुख्य शिरांजवळ पिवळ्या रंगाचे विखुरलेल्या अवस्थेत चट्टे दिसतात. सोयाबीनची पाने जशी वाढत जातात तस तसे त्यावर तांबूस रंगाचे चट्टे दिसू लागतात. काही वेळा जास्त प्रादुर्भाव असल्यास पाने अरुंद होतात आणि कोमजतात. या रोगामुळे उत्पादन क्षमता ३० ते ९० टक्क्यांपर्यंत घटते. काही वेळा जास्त प्रादुर्भाव असल्यास पाने अरुंद होऊन मुरगळतात. लहान अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास पूर्ण झाड पिवळे पडते. अशा झाडांना कालांतराने फुले आणि शेंगा कमी लागतात किंवा त्यातील दाण्यांचा आकार लहान राहतो किंवा संपूर्ण शेंगा दाणे विरहीत राहून पोचट होतात. पर्यायाने उत्पन्नात मोठी घट येते. काही वेळेला सोयाबीन शेंगाच लागत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळीच काळजी घेण्याचे आवाहन तालुका कृषी विभागाद्वारे करण्यात आले आहे.

# खाद्य तेल, भाजीपाल्याच्या भावात आली तेजी

## लाडक्या बहिणीच्या डोळ्यात आले पाणी





**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अमरावती**

मागील पंधरवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे भाजीपाला व वेलवर्गीय पिकांचे नुकसान झाले आहे. परिणामी, भाजीपाल्याची आवक कमी झाली असून बाजारपेठेसह किरकोळ बाजारात भाजीपाल्याचे दर चांगलेच कडाडले आहेत. भाजीपाल्यासह हिरव्या पालेभाज्या महागल्याने महिलांच्या स्वयंपाकाचे बजेट डळमळीत झाले आहे. यंदा सर्वच भाजीपाल्याचे भाव गगनाला भिडले आहे तर दूसरी कड़े खाद्य तेलाच्या भावात किलोमागे २०रु. वाढविल्यानेलाडक्या बहिनीला खर्चाचा मेळ बसविण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

जिल्ह्यात अधून-मधून सुरू असलेल्या पावसामुळे पुन्हा नव्याने लागवड करण्यात आलेल्या भाजीपाल्याला फटका बसणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवस भाजीपाल्याचे दर आणखी भडकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.बाजारात पालेभाज्यांची मागणी वाढली आहे. मात्र, आवक कमी असल्याने पालेभाज्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. पालक, राजगिरा, मेथी, चवळी भाजी व अन्य भाज्यांचे दरही वाढले आहे. कोथिंबीरही चांगलीच महागली आहे. मेथीची भाजी तर बाजारातून गायब झाल्याचे चित्र दिसून आले.

**अतिवृष्टीचा फटका**

भाजीपाला पिकांना मोठ्या प्रमाणात अतिवृष्टीचा फटका बसला आहे. परिणामी, भाजीपाल्याचे नुकसान झाले असून भाजीपाल्याचे नवीन उत्पादन कमी झाले आहे. सध्या हिरव्या पालेभाज्यांचीदेखील बाजारात आवक कमी झाली आहे. फुलकोबी, टोमॅटो, बटाटा, पत्ताकोबी, हिरवी मिरची, चवळी शेंगा, गवारफल्ली, वाल शेंगा, दोडका, सिमला मिरची, कारले, भेंडी, टोंड्री आदी भाजीपाल्यासह विविध कडधान्य, किराणा सामान तसेच जीवनावश्यक सर्वच वस्तू महागल्या आहेत. वाढत्या महागाईचा सर्वाधिक फटका सर्वसामान्यांना बसला. सणांवर महागाईचे सावट पसरल्याचे यावेळी दिसून आले.

# नरेंद्र शेळके यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्कार प्रदान



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

वरुड तालुक्यातील करजगाव येथील रहिवासी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागीय कार्यालयात अभियंता म्हणून कार्यरत नरेंद्र शेळके यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर अमरावतीद्वारे अभियंता दिनी त्यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने गौरवण्यात आले. नरेंद्र शेळके यांनी पाणी पुरवठा योजनांचे संकल्पन करून त्या यशस्वीरित्या कार्यान्वित केल्या आहेत. त्यांच्या नावीन्यपूर्ण व कल्पक अशा तांत्रिकउपाययोजनांमुळे शासनाच्या कोट्यवर्षीची बचत झाली आहे. त्यापैकी त्यांच्या कार्यकाळात – जिल्ह्यातील १०५ गावे ग्रामीण – प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ही – गुरुत्वावर आधारित योजना आहे. त्यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे ही योजना विहित कालावधी पेक्षा १०४ दिवस आधीच कार्यान्वित झाली. ही बाब महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या इतिहासात गौरवाची आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने सन्मानित केले. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल समाजाच्या विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# इयत्ता अकरावीचे अद्यापही ६३१९ जागा रिक्त : विशेष फेरीत केवळ ९८४१ प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**



मनपा क्षेत्रात अकरावी प्रवेश प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आली आहे. ६८ विविध कनिष्ठ महाविद्यालयात यंदा १६,१६० जागेसाठी विविध फेऱ्या आटोपल्या आहे. सुमारे ६,३१९ जागा रिक्त राहिल्या आहेत. त्यामुळे उर्वरित जागेसाठी सहावी विशेष फेरीचे आयोजन केले आहे. प्रवेश अर्ज नोंदविण्यासाठी बघवारी १८ सप्टेंबरपासून सुरूवात होणार आहे. प्रवेश अर्ज शनिवारी २१ सप्टेंबर पर्यंत स्वीकारणार आहेत.त्यानंतर मंगळवारी २४ ते बुधवारी २५ सप्टेंबर पर्यंत विद्यार्थ्यांना संबधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यायचे आहे. अशी माहिती अकरावी प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी दिली आहे. आजवर ९,८४९ प्रवेश झाले आहेत. शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये यावर्षीही इयत्ता अकरावीची ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.शून्य, प्रथम, द्वितीय, तृतीय व त्यानंतर आता विशेष फेरींना सुरूवात झाली आहे. पाच विशेष फेरीअंती शहरातील कनिष्ठ महाविद्यालयात सुमारे ९,८४१ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झालेआहेत. आजघडीला ६,३१९ जागा रिक्त आहेत. गतवर्षी ३५ टक्के जागा रिक्त राहिल्या होत्या. तत्पूर्वी, वंचित राहिलेल्या विद्याथ्यर्थ्यांसाठी पुन्हा एकदा सहावी विशेष फेरी राबविण्यात येत आहे. यासाठी आगामी १८ सप्टेंबरपासून प्रवेश अर्ज करण्यास सुरुवात होत आहे. याची गुणवत्ता यादी मंगळवारी २४ सप्टेंबरला प्रसिद्ध होईल. त्यानंतर त्याच दिवसापासून प्रवेशाला सुरूवात होणार आहे. ही प्रवेश प्रक्रिया २५ सप्टेंबर पर्यंत चालणार आहे. मात्र, त्यानंतर प्रवेश प्रक्रिया बंद होणार अशी माहिती प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्रा.अरविंद मंगले यांनी दिली.

# लाडक्या बाप्पाला निरोप देताना 'या' गोष्टींची काळजी घ्या


**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अमरावती**

गणपती विसर्जन करताना विसर्जनाच्या आधी गणपतीची विधीवत पूजा करावी. त्यानंतर त्यांना शेंदूर, अक्षता लावा. तसेच, इलायची, फूल, सुपारी, दुर्वा, पान, नारळ, मध, गुलाल आणि तांदूळ अर्पण करा. देवासमोर धूप, दिवा लावा. तसेच, लाडू, मोदक, केळं यांचा नैवेद्य गणरायाला दाखवा आणि आरती करा.

या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घ्या की, विसर्जन करताना गणेश मूर्तीबरोबर फळ, फूल, वस्त्र तसेच मोदकाची मूठ अर्पण करा. त्याचबरोबर, तांदूळ, गहू, पंचमेवा आणि नाणंसुद्धा द्या.

**विसर्जन करताना 'या' गोष्टींची काळजी घ्या**

गणेश चतुर्दशीच्या दिवशी ढोलताशांच्या



गजरात गणरायाचं स्वागत केलं जातं. त्याचप्रमाणे, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाची भव्य मिरवणूक काढून गणपतीचं विसर्जन केलं जातं. मात्र, या दरम्यान काही गोष्टींची काळजी घेणं गरजेचं आहे. विसर्जनाला जाताना चामड्याचा बेल्ट, घड्याळ तसेच पर्सबरोबर घेऊ नका. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, गणपती विसर्जन करताना कधीच बूटं, चपला घालून गणपतीचं विसर्जन करण्याची चूक करु नका.

# ५सप्टेंबर शासन निर्णयाचा काळी फित लावून शिक्षकांकडून निषेध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ भातकुली**

नुकताच ५ सप्टेंबर २०२४ ला शिक्षक दिन झाला,या दिवशी शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव केला जातो,शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला जातो, पण याच दिवशी एकीकडे शिक्षाकांच्या कार्याचा गौरव सुरू असतांना,शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळत



असतांना दुसरीकडे मात्र महाराष्ट्र शासनाचा एक शासन निर्णय येवून धडकला.हा शासन निर्णय म्हणजे भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्था च्या शाळा टिकतील की नाही याबाबत शंका उपस्थित करणारा आहे.

या शासन निर्णयानुसार २० किंवा २०पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये सेवानिवृत्त किंवा कंत्राटी भरती करण्याबाबत आहे,असे झाले तर भविष्यात विद्यार्थी गुणवत्ता धोक्यात येवून परिमानी शाळा बंद पडण्याची भीती आहे.त्यामुळे या शासन निर्णयाला विरोध म्हणून सर्व संघटना सक्रिय झाल्या असून आजपासून विवीध प्रकारचे आंदोलन सुरू होत आहे, आजच्या पहिल्या दिवशी सर्व शाळांमधील शिक्षक काळी फित लावून आध्यापनाचे कार्य करणार आहेत व या माध्यमातून आपला विरोध दर्शविणारा आहे.

# माजी कुलगुरू डॉ.पंकज चांदे यांची विद्यापीठातील संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राला भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती ७**



कविकुलगुरू कालिदास विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंकज चांदे हे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राच्याच्यावतीने आयोजित व्याख्यान कार्यक्रमाला आले असतांना त्यांनी विद्यापीठातीलच संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, माजी मंत्री डॉ. सुनिल देशमुख, माजी महापौर मिलींद चिमोटे, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी अध्यासन केंद्रामधील संत गाडगे बाबांच्या दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनीची पाहणी केली. यावेळी अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. दिलीप काळे यांनी अध्यासन केंद्राच्यावतीने राबविण्यात येणा-या उपक्रमांची माहिती दिली, गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार होत असलेल्या उपक्रमांची मान्यवरांनी प्रशंसा केली.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप च्या गणपती राजाला निरोप हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत श्रींची मिरवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अमरावती**



पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे गणपती उत्सव गेल्या दहा दिवसांपासून उत्साहात साजरा करण्यात आला यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अंतर्नाद क्लब, फोटोग्राफी क्लब, सोशल मीडिया क्लब द्वारा सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत खुर्ची, क्विझ स्पर्धा, रांगोळी स्पर्धा , टेक्निकल स्पर्धा, गायन स्पर्धा अश्या रंगारंगी कार्यक्रम चे दहा दिवस आयोजन करण्यात आले. पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मधील अभियांत्रिकी, एमबीए, एमसीए, फार्मसी, बीएएमएस, एग्रीकल्चर, आर्किटेक्चर, नर्सिंग, बीएड महाविद्यालयाच्या प्राध्यापक विद्यार्थ्यांनी नित्यनियमाने पूजा आरती करत श्रींची मनोभावे सेवा केली.अनंत चतुर्दशी च्या दिवशी टाळ मृदुंग, लेझिम, ढोलपथक व डीजे च्या तालावर नाचत पी.आर. पोटे पाटील ग्रुप च्या राजाला हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या चा जयघोष करत विसर्जन करण्यात आले.यावेळी संस्थेचे सचिव श्रेयशदादा पोटे पाटील , महाविद्यालयाचे संचालक, प्राचार्य, डीन, विभागप्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते.

# जड अंतःकरणाने लाडक्या बाप्पाला निरोप

## शहरात ५३२ सार्वजनिक मंडळांच्या गणेश विसर्जनाला प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

अमरावती शहरात अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जनाला प्रारंभ झाला आहे. शहरात सुमारे दीड लाख घरगुती गणेशमूर्ती आणि ५३२ सार्वजनिक गणेश मंडळांनी गणेशाची स्थापना केली होती. आज मंगळवारी, सर्वाधिक १७६ सार्वजनिक मंडळातील गणेशमूर्तींचे विसर्जनला सुरुवात झाली आहे . याआधी १६ सप्टेंबर रोजी १५ सार्वजनिक गणेश मंडळांनी आपले गणेश विसर्जन केले आहे.

गणेश विसर्जनाच्या निमित्ताने शहरातील विविध ठिकाणी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. छत्री तलाव, वडाळी, प्रथमेश व कोंडेश्वर तलाव यांसारख्या ठिकाणी बाप्पाच्या मूर्तींचे विसर्जनकरण्यात येत आहे. याशिवाय घरगुती गणपतीच्या विसर्जनासाठी महापालिकेतर्फे टैंक आणि कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली आहे, ज्यामुळे विसर्जन प्रक्रिया अधिक सोयीस्कर झाली आहे



सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सुमारे १४०० पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात असतील. छत्री तलावावर येणाऱ्या वाहनचालकांसाठी विविध ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामध्ये श्रीराम मंदिराजवळील खुलं मैदान, एक्स्प्रेस हायवेवरील उड्डाणपुलाच्या आजूबाजूला तसेच गोयंका लॉनमागील खुल्या जागांचा समावेश आहे.त्यासाठी पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या नेतृत्व ज ४ पोलीस उपअधीक्षक, २० पोलीस निरीक्षक, ११५ साहाय्यक व उपनिरीक्षक, ३५ प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक, १६०० अंमलदार, एसआरपीएफ, आरसीपी, ११ स्ट्रायकिंग फोर्स, क्यूआरटी व ८०० होमगार्ड सजग आहेत. शहरातील ५३२ सार्वजनिक गणेश मंडळांनी गणपती प्रतिष्ठापना केली होती, ज्यापैकी विसर्जन विविध तारखांना नियोजित आहे.

**विसर्जनाच्या तारखा पुढीलप्रमाणे आहेत**

१७ सप्टेंबर: १७६ मंडळे
१८ सप्टेंबर: १४८ मंडळे
१९ सप्टेंबर: ११७ मंडळे
२० सप्टेंबर: ६२ मंडळे
२१ सप्टेंबर: १२ मंडळे
२२ सप्टेंबर: २ मंडळे
२३ सप्टेंबर: १ मंडळ

# दोन वर्ष उलटूनही अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी बंदच

## ३१ सप्टेंबर पर्यंत भातकुली शहरातील अभ्यासिका सुरू झाली नाही तर तोडू : तुषार भारतीय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ भातकुली**

सोमवारी भातकूली तालुक्यातील विविध विकास कामाचे लोकार्पण व भूमिपूजन सोहळा तुषार भारतीय यांच्या हस्ते संपन्न झाला यावेळी भातकुली शहरातील आशीर्वाद मंगल कार्यालय येथे ते आले असता त्यांना शहरातील काही तरुण युवकांनी शहरातील अभ्यासिका सुरू करण्यात यावी असे निवेदन दिलेशहरातील अभ्यासिकेची बांधकाम दोन वर्षाआधी ६७ लाख रुपये खर्च करून पूर्ण झाले असून दोन वर्ष उलटूनही अभ्यासिका अद्यापपर्यंत सुरू करण्यात आली नसल्यामुळे भातकुली शहरातील तरुणांना अमरावती येथे अभ्यास करण्याकरिता जावे लागते त्यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक ,आर्थिक , व शारीरिक नुकसान होत आहेयावेळी तुषार भारतीय यांनी शहरातील युवकांना येत्या ३१ सप्टेंबर पर्यंत भातकुली शहरातील अभ्यासिका सुरू होईल असे आश्वासन दिले जर तसे झाले नाही तर त्या अभ्यासिकेचे कुलूप फोडून विद्यार्थ्यांसाठी ती अभ्यासिका खुली करून दिली जाईल असे यावेळी तुषार भारतीय म्हणालेत.

# महापालिकेच्या कृत्रिम टँकलाही मिळतो आहे प्रतिसाद

## नागरिकांनी मानलेत आभार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

मनपाने गणपत विसर्जनासाठी अभियंता भवन, शेगाव नाका, सहकार नगर, ग्राऊंड, फार्मसीशासकीयविद्यालय, कठोरानाका, आराधनाबिल्डींग रिंगरोड, चाणक्य हॉटेल, नागपुर रोड, शिवाजी कमर्शियल मार्केट, रविनगर चौक, नेहरु मैदान, प्रशांत नगर बगिचा, मालटेकडी जवळ, प्रथमेश तलाव वडाळी, छत्रीतलाव, विद्यापीठ चौक, पुलाजवळ, मोती नगर, बगीचा, साईनगर, साईमंदीर जवळ, बडनेरा, झिरी तलाव, गोपाल नगर, जीम जवळ, बडनेरा, बारीपुरा, रवी नगर, महाजनपुरा हनुमान नगर, बुधवारा याठिकाणी नागरीकांना आर्टीफिशीयल टँकची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. नागरीकांनी आपल्या घरातील श्री. गणेश विसर्जन नेमून दिलेल्या जवळच्या आर्टीफिशीयल टँकमध्येच विसर्जन करावे. जेणेकरुन पर्यावरणाचा समतोल साधणेस व स्वच्छता मोहीमेस नागरीकांचा हातभार लागेल असे आवाहन मनपा आयुक्त सचिन कलंत्रेनी केले आहे. त्यांच्या या आवाहनाला अमरावतीकरांनी प्रतिसाद दिला आहे मनपाचे माजी स्थायी समिती सभापती मिलिंद बांबल यांनी रवीनगर चौक , शिवाजी अपार्टमेंट समोरील कृत्रिम टँक मध्ये परिवारासह घरगुती गणपती चे विसर्जन केले यावेळी माजी स्थायी समिती सभापती मिलिंद बांबल , मध्य झोन सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर , उपअभियंता प्रमोद इंगोले , सहाय्यक अभियंता लक्ष्मण पावडे , अभिजीत पवार ,पंकज तठे , निकेश तायडे , महेश पळसकर , सामाजिक कार्यकर्ता दीपक बांबल , सौ.प्रीती बांबल , सौ.विजया बांबल , सौ. अनुजा बांबल , शुभम बांबल , सिध्येश बांबल , रिध्येश बांबल , पुर्वा बांबल , संजय वाघुळकर यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते

# गुरुवारला मेघालयचे राज्यपाल यांचा अमरावती दौरा

## महामहीम मेघालय राज्यपालांची मेंढपाळांच्या राहूटीवर भेट
## राज्यपालांकडून मेंढपाळ धनगरांच्या समस्यांची दखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

मेघालय राज्याचे राज्यपाल तथा धनगर समाजाचे कर्नाटक राज्यातील ज्येष्ठ नेते महामहीम मा. चंद्रशेखर एच विजयशंकर यांचा दौरा निश्चित झालेला आहे. गुरुवार दिनांक १९ सप्टेंबरला महामहिम राज्यपाल महाराष्ट्रातील भटकंती करणाऱ्या मेंढपाळ धनगरांच्या ज्वलंत प्रश्नाविषयी अमरावती येथे बैठक घेणार आहेत. यावेळी त्यांच्यासोबत मा. पद्मश्री डॉ. विकास महात्मे साहेब उपस्थित राहणार आहे. भटकंती करणाऱ्या मेंढपाळ धनगरांच्या राहुटीवर त्यांच्या समस्या जाणून घेणार आहेत.

आपल्या शेळी मेंढीच्या पालनपोषणाकरिता सतत भटकंती करणारा मेंढपाळ धनगर समुदाय असून आपल्या पशूंच्या पालन पोषणार्थ त्यांना सतत भटकंती करावी लागते. वनविभागाच्या नवनवीन जाचक नियमामुळे वनक्षेत्रातील त्यांच्या अधिवासावर प्रतिबंध आलेला आहे. मेंढपाळ समुदायाची सर्वात मोठी समस्या ही चराईक्षेत्राची आहे. विशेषतः पावसाळ्यात जेव्हा चारा उपलब्ध नसतो त्यावेळी मेंढपाळ धनगर आपल्या पशूंना घेऊन जंगलाच्या कडेने, पायथ्याशी राहूटी करून राहतात. यावेळी त्यांचा प्रशासनासोबत विशेषता वनविभाग, महसूल विभाग व पोलीस विभाग यांच्यासोबत मोठ्या प्रमाणात संघर्ष होतो. यावेळी त्यांना प्रशासनाकडून



मोठ्या प्रमाणावर त्रास दिला जातो. आर्थिक नुकसानी सोबत प्रसंगी जीवित हानी सुद्धा होते. पावसाळ्यामध्ये चाऱ्याची कमतरता, आरोग्य विषयक सोयी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात त्यांचा पशुचे मृत्यू होतात. सतत भटकंती करीत असल्यामुळे त्यांच्यामध्ये शिक्षणाचा अभाव आहे. त्यामुळेच आरोग्यासोबत इतर सामाजिक प्रश्न सुद्धा आहेत. हा समुदाय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून लांब आहे. या भटकंती करणाऱ्या मेंढपाळ समुदायाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, या संघर्षातून मार्ग काढण्यासाठी त्यांच्या जीवनात स्थैर्य देण्याच्या दिशेने मेंढ्यांच्या चराई व उदरनिर्वाहबाबत चिरकाल टिकाऊ उपयोजना करण्याकरिता मेंढपाळ धनगर विकास मंच ही संघटना मागील पंधरा वर्षापासून कार्यरत आहे. मा. पद्मश्री डॉक्टर विकास महात्मे साहेब यांच्या सहकार्याने मेंढपाळ धनगर विकास मंच विविध स्तरावर या समस्येची मांडणी करीत आहे. या अनुषंगाने राज्य सरकार व भारत सरकारकडे केलेल्या विनंतीवरून मेंढपाळ धनगरांचे प्रश्न समजून घेण्याकरिता मा. महामहीम राज्यपाल यांनी अमरावती येथे वेळ दिलेली आहे. महामहीम राज्यपालांचे १९ सप्टेंबरला सकाळी ११.३० वाजता सर्किट हाऊस, अमरावती येथे आगमन होत आहे. दुपारी १२ ते १.३० वाजेपर्यंत चांदुर रेल्वे,तालुक्यातील विठोबा सावंगा शिवारातील सोमाजी पोकळे यांच्या धनगरा वाढ्यावर भेट देऊ त्यांच्या परिवारा सोबत संवाद करणार आहे. दुपारी १.३० वाजता संतोष महात्मे, अध्यक्ष राजमाता अहिल्यादेवी फाऊंडेशन चे पदाधिकारी व अमरावती सह धनगर समाज संघर्ष समिती चे संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हाध्यक्ष यांच्यासोबत मॉगीलाल प्लॉट कॅम्प रोड अमरावती येथे संवाद साधणार आहेत त्यानंतर दुपारी ३.३० वाजता ते नागपूर करिता प्रस्थान करतील



# दुर्मिळ मोरंगी गरुड अवतरला, झाली पक्षीगणना सफल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७वर्धा**

निसर्गसाथी फाउंडेशनच्या वतीने तहसील कार्यालय हिंगणघाट येथे असलेल्या पाणपक्षी घरटी गणना करण्यात आली. हिंगणघाट तहसील कार्यालय, पंचायत समिती, जि.प.उपअभियंता कार्यालय या परिसरामध्ये मागील शंभर वर्षांपासून पानपक्षांची मिश्र विन वसाहत दरवर्षी येथे बसत असते .यामध्ये प्रामुख्याने चार प्रजातींच्या पक्ष्यांची घरटी पाहायला मिळते. दरवर्षी मे महिन्याच्या सुरुवातीला येथे घरटी तयार व्हायला लागतात व ऑक्टोबर महिन्यापर्यंत या पक्षांचे प्रजनन पूर्ण होऊन ही वसाहत तिथून निघून जाते.

यावर्षी घरटी प्रगतीमध्ये एकूण सर्व प्रजाती मिळून ११६ घरटी मोजण्यात आली आहे त्यात प्रामुख्याने सर्वाधिक घरटी गायबगळा या प्रजातीची होती दुसऱ्या क्रमांकावर रात बगळ्याची २६ घरटी आढळून आली छोटा बगळा या प्रजातीची १७ तर छोटा पानकावळा या प्रजातीची ११ घरटी आढळून आली. पहिल्यांदाच या गनने मध्ये भारतीय पानकावळा या प्रजातीची चार घरटी आढळून आली आहे.

हेरोनरीला सारंगागार म्हणतात. हे पानपक्षी प्रजननासाठी समूहाने मानवी वस्तीमध्ये वसाहत करून हे पक्षी घरटी करतात. सारंगागार मधील प्रजनन अधिक प्रमाणामध्ये यशस्वी होण्यासाठी या ठिकाणी कवट,चिंच,देशी बाभूळ या झाडांची लागवड होणे गरजेचे आहे. हिंगणघाट येथील तहसील कार्यालय, पंचायत समिती, जि.प.उपअभियंता कार्यालय या परिसरामध्ये मागील शंभर वर्षांपासून पानपक्षांची मिश्र विन वसाहत दरवर्षी येथे बसत असते . दरवर्षी मे महिन्याच्या सुरुवातीला येथे घरटी तयार व्हायला लागतात व ऑक्टोबर महिन्यापर्यंत या पक्षांचे प्रजनन पूर्ण होऊन ही वसाहत तिथून निघून जाते. गणना अधिकारी म्हणून पक्षीमित्र विदर्भ समन्वयक राहुल वकारे ,बोर फाउंडेशनचे सचिव अशोक भानसे,कोषाध्यक्ष पवन दरणे ज्ञानचंद गलवाणी,अमोल मुनेश्वर इत्यादी सहभागी झाले होते. निसर्गसाथी फाउंडेशनचे अध्यक्ष प्रवीण कडू ,चैतन्य वावधने, यशवंत शिवनकर, निजाजुद्दीन सिद्दीकी, बालाजी राजूरकर, प्रभाकर कोळसे, यशवंत गडवार, कु.अंजोर कडू, केवलचंद सिंघवी,अजय मोहाड सहभागी झाले होते.

# गुरुकुंजात आतंर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे भव्य आयोजन

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५६ व्या पुण्यतीथिती निमित्य स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७गुरुकुंज मोझरी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाच्या ५६ व्या पुण्यतीथी महोत्सवा निमित्य गुरुकुंज आश्रम येथे राष्ट्रीय सेवा योजना व श्रीगुरूदेव आयुर्वेद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालीयन वक्तृत्व स्पर्धेचे भव्य आयोजन १६ आक्टोंबर रोजी सकाळी १० ते ५ यावेळेत करण्यात आले आहे.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे संघटन शक्ति विषयक विचार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे ग्रामशुध्दि विषयक विचार व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची सणोत्सवाची संकल्पना असे तिन विषय स्पर्धेसाठी ठेवण्यात आले आहे. स्पर्धेतील प्रथम विजेत्याला स्व इंदुताई अजाबराव देशमुख यांच्या स्मरणार्थ १०००१ रुपयांचे नगद पारितोषीक,स्व शांताबाई शामरावजी बोबडे यांच्या स्मरणार्थ ५००१ रुपयांचे द्वितीय पारीतोषीक,डॉ स्व अनिल गंधे यांच्या स्मरणार्थ ४००१ रुपयांचे तृतीय पारीतोषीक,स्व रमेश लकडे यांच्या स्मरणार्थ २५०१ रुपयांचे चतुर्थ पारीतोषीक व ड अशोक कोठारी यांच्या तर्फे १५०१ रुपयांचे पाचवे पारीतोषीक व डॉ जयस्वाल यांच्या तर्फ ग्रामगीता भेट देण्यात येणार आहे.

ज्या स्पर्धकांना वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घ्यायचा असेल त्यांनी आपले आवेदनपत्र आपल्या महाविद्यालयाच्या वतीने sgayucgmail.com किंवा ७५८८५७४०१९ व्हॉटपवर पाठवावी व अधीक माहितीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधीकारी डॉ लक्ष्मीकांत पायमल्ले यांच्या ७५८८५७४०१९ या भ्रमणध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मुरलीधर खारोडे यांनी केले आहे.अखील भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे आरोग्य विश्वस्त डॉ पी.पी.पाळेकर यांच्या मागदर्शनात वक्तृत्व स्पर्धेचे नियोजन पुर्ण झाले आहे.